# प्रभाकर वैद्य

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४६०

# गाठी

REFBK-0023598
REFBK-0023598

संदर्भ काव्य
२८६०
२३५९८
पात८२

# साक्षी

प्रभाकर वैद्य

REFBK-0023598

अभिनव प्रकाशन मुंबई १४

प्रकाशक :

श्री. वामन विष्णु भट

अभिनव प्रकाशन
५३, गुरु नानक मार्केट, डॉ. आंबेडकर रोड,
दादर, मुंबई १४.

© प्रभाकर वैद्य

प्रथमावृत्ती : २६ जानेवारी १९८०

मुखपृष्ठ : विश्वनाथ घैसास

किंमत : दहा रुपये

मुद्रक :

श्री. प्र. ह. पाटील
संतोष मुद्रणालय,
अलिबाग, जि. कुलाबा

# पुरस्कार

नक्की साल आठवत नाही; पण बरीच वर्षे झाली; माधव मनोहर एके दिवशी एक जाडजूड वही घेऊन मजकडे आले व ती माझ्या स्वाधीन करून तिच्यातील लेखन वाचून पाहण्याची त्यानी मला विनंती केली. त्यांचे बंधू प्रभाकर वैद्य यानी आपल्या तुरुंगवासात लिहिलेल्या काव्यपंक्तींनी ती वही भरलेली होती.

प्रभाकर वैद्य हे माझे नाशिकच्या एच् पी. टी. कॉलेजमधील एफ वाय्. च्या वर्गातील सहाध्यायी. १९३१ साली मी नाशिक सोडले आणि मुंबईस आलो. माधव मनोहरांशी परिचय झाला तोही मुंबईस आल्यावर; नाशिकला असताना नव्हेच. प्रभाकर वैद्य माझे वर्ग बंधू खरे; परंतु त्यांना मुंबईस आल्यावर देखील मी माधवरावांचे धाकटे बंधू या नात्यानेच केवळ ओळखत होतो. ते कम्युनिस्ट पक्षाचे सभासद झाल्याचे कानावर आले होते; प्रत्यक्ष त्यांच्याशी असा माझा परिचय नव्हता.

तेव्हा माधवरावांनी त्यांच्या कवितांची वही माझ्या हातात दिल्यानंतर माझी पहिली प्रतिक्रिया झाली ती आपणास प्रचारकी थाटाची कविता वाचायला मिळणार ही.

परंतु माधवराव गेल्यावर त्या वहीतील कविता वाचू लागलो आणि माझा भ्रमनिरास झाला. त्या कवितेत कोठेच मला 'कम्युनिस्ट' प्रभाकर वैद्य भेटत नव्हते; भेटत होते ते जीवनव्यवहारांचा अन्वयार्थ लावण्यात रमलेले एक मन.

या मनाने कुसुमाग्रजाना मोह घातला याचे मला आश्चर्य वाटले नाही; कारण या दोन्ही मनाचे जवळचे नाते आहे हे वैद्यांच्या या संग्रहातील कविता वाचताना लक्षात येते. यावेळी प्रभाकर वैद्य यांच्या कवितांची वही घेऊन माधवराव मजकडे आले ते कुसुमाग्रजांच्या सांगण्यावरून. कुसुमाग्रजांनी त्यांना आवडलेल्या

कवितांवर खुणा केल्या होत्या व त्या मी नजरेखालून घालाव्या असे सुचविले होते. त्यांच्या प्रमाणे त्या मलाही आवडल्या हे सांगण्याची आवश्यकता नसावी.

तेव्हा या कवितासंग्रहावर संपादकाचे नाव नसले तरी तो कुसुमाग्रजांनी संपादिला आहे. असेच मी म्हणेन. या संग्रहाला छोटेसे का होईना, प्रास्ताविक कुसुमाग्रजांनी लिहायला काहीच हरकत नव्हती; परंतु त्यांच्या नेहमीच्या स्वभावानुसार त्यांनी सोयिस्कर-पणे ते काम मजवर सोपविले.

मी एवढेच म्हणेन, की एका प्रगल्भ भारतीय मनाचे हे प्रगट जीवन-चिंतन आहे- या चिंतनातून जर 'बांधिलकी' व्यक्त होत असली तर ती केवळ जीवनातील श्रेष्ठ मूल्यांची. चांगल्या लेखनाने मला नेहमीच अस्वस्थ केले आहे; तुम्हा आम्हाला अस्वस्थ कर-ण्याची शक्ती या लेखनात निःसंशय आहे.

'साहित्य सहवास' वा. ल. कुळकर्णी
मुंबई ४०००५१ २१-१२-७९

# कुसुमाग्रजांच्या पत्रातून–

'तुम्ही स्वतःच्या काव्यलेखनाबाबत बोललात तेव्हा मला आश्चर्य वाटले. तसे पाहिले तर थोरल्या बंधूंमुळे तुमच्या सभोवार ललित साहित्याची वर्दळ भरपूर असणार. पण खरे सांगायचे तर, तुमचा आणि माधव मनोहरांचा एकत्रित विचार माझ्या मनात तरी कधीच येत नसे. अद्यापही येत नाही. माधवरावांचा माझा स्नेह खूप जुना, कॉलेज काळापासूनचा. पण तेव्हाही थोरल्या बंधूंच्या परिवारात तुम्ही कधी दिसला नव्हता. मला वाटतं, तुम्ही तुमचा रस्ता स्वतंत्र-पणाने, वेगळेपणानेही काढीत होता. नंतर बऱ्याच वर्षांनी कानावर आले की तुम्ही कम्युनिस्ट चळवळीत आहांत. आणखी काही वर्षांनी कळले की तुम्ही कम्युनिस्ट पक्षातील एक प्रमुख कार्यकर्ते आणि विचारवंत आहात. या काळात आपली लक्षात रहाण्यासारखी मुलाखत कधी झाल्याचे मला आठवत नाही. प्रभाकर वैद्य म्हणजे एक कट्टर कम्युनिस्ट कार्यकर्ते, माधवरावांचे भाऊ; पण त्यांच्या क्षेत्राशी संबंध नसलेले, असे समीकरण मनात कोठेतरी रुजलेले.

तीनचार वर्षांपूर्वी तुम्ही प्रत्यक्ष चळवळीतून रिटायर्ड झालात, आणि नाशिकला येऊन राहिलात. येथे आपल्या भेटीगाठीही वारंवार पडू लागल्या. अशाच एका भेटीत तुम्ही सांगितलंत की मी काव्य किंवा काव्यासारखे काहीतरी लिहिले आहे. मी चकितच झालो. वाङ्मयांतही तुम्हाला रस आहे हे आत्तापर्यंत माझ्या लक्षात आले होते. अनेक कम्युनिस्ट वा समाजवादी कार्यकर्ते वाङ्मयाच्या बाब-तीत फारच अश्राप असतात. प्रचलित समाजरचनेचा खडक फोड-ण्याचे एक साधन, एक हत्यार, एवढीच त्यांची वाङ्मयासंबंधीची बालबोध कल्पना. ही समजूत तुम्हाला मान्य नव्हती हे लक्षात आले होते. पण ललित वाङ्मयाच्या गाभ्याशी, म्हणजे काव्याशी, तुम्ही स्वकर्तृत्वाने कोठे गुंतलेले असाल अशी मात्र अजिबात कल्पना नव्हती. आणि म्हणून तुम्ही जेव्हा स्वतःच्या काव्याबाबत बोललात तेव्हा

वाटले की ही काव्यरचना हाणामारीची, ठोकाठोकीची, माणसाच्या अनुभवाचा नव्हे, तर त्याच्या मतांचा घोषणात्मक आविष्कार करणारी असावी. परंतु कवितांच्या वह्या प्रथम चाळताना दुसरा आश्चर्याचा धक्का बसला. 'टिकटिक,' 'ओरखडे,' 'हेमांगिनी' अशा काही कविता वाचून, ही कविता एका कविमनाच्या उत्कट आणि तरल संवेदनेतून उगवलेली आहे, हौसेनी बनविलेली नाही, हे लक्षात आले. नंतर सर्व वह्या बारकाईने वाचल्या. ही कविता प्रकाशित व्हायला हवी असे वाटले. मी येथे परीक्षा करीत नाही वा करू शकतही नाही. पण अंधारात उडणाऱ्या ठिणग्यांसारखी भासणारी ही काव्ये मला खूपच वेगळी आणि वेधक वाटली. तुरुंगात या कवितेचा जन्म झाला आणि पुढे राजकीय चळवळीच्या धावपळीत ती अंकुरत राहिली. यामुळे शैलीची सफाई अथवा रचनेची कलाकुसर तीत प्रगट होणे असंभवनीयच होते. पण तिच्यातील धग आणि आच इतकी तीव्र आहे, प्रांजळता इतकी नितळ आहे की कलाकुसर नाही हेच बरे वाटते. एकूण सर्व संग्रहाचे स्वरूपच काव्याचे कच्चे पण अस्सल द्रव्य सर्वत्र विखरून पडल्यासारखे आहे. तुम्ही एके ठिकाणी म्हटल्या-प्रमाणे हा आत्मगत संवाद आहे, वाचकाची अपेक्षा न ठेवता केलेला. पण या संवादात म्हणजे काव्यलेखनात एक विलक्षण अदम्यता आहे. ही अदम्यता अस्सल कवीच्या मनात आणि भूमिकेतच संभवते. म्हणून ही कविता वाचकांच्या अपेक्षेने लिहिली गेलेली नसली तरी वाचकांसमोर येणे आवश्यक आहे.

२२-१२-७९
नाशिक

वि. वा. शिरवाडकर

**अर्पण पत्रिका–**

तिला–
जिनं जन्मभर
सांभाळलं मला–
ज्याला सांभाळणं
सोपं नव्हतं;
–साधंही नव्हतं !

श्री. **प्रभाकर वैद्य** यांची ग्रंथ संपदा

- महात्मा फुले आणि त्यांची परंपरा
- चक्रधर
- वल्लभभाई पटेल : एक परखड मूल्यमापन
- वंदेमातरम्– जनगणमन

**आगामी**

- आंबेडकर आणि त्यांचा धम्म
- जे. पी.– एका शोकांतिकेचा शोध
- कविता–व्यासोच्छिष्टम्–
(पंचपती = व्रता आणि इतर कविता)

• • •

## उधळण

क्षणांत एका मत्त वादळी
गगनी उधळल्या मोक्तिक माला !

एक एक अन् खडे शोधितो
– उरला आता एकच चाळा !

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६०
दा. क्र. २३५९८
काव्य पा‍ट‍ले२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

सुख-दुःखाने अतर रडले;
पाप-पुण्य अन् नंतर घडले !

० ० ०

कोण कण्हतसे आंत-आंतुनी ?
-क्षणी सुखाच्या वृथा टोचणी !

० ० ०

जितेपणाचा रितेपणा हा,
- मरणाने परि भरणार अहा !

० ० ०

ऋतानृताची नसती नाती,
- उगा बांधुनी फिरतो जगती !

० ० ०

आरशाला आठवत नाही,
-हेच किती बरं ?

० ० ०

वाटाड्याची वटवट चालू
- स्तब्ध उभा परि ताजमहाल !

० ० ०

वांझेलाही असतो प्रियकर !
अन् नपूंसकाला असे प्रेयसी !

० ० ०

काळोखाला घाबरणारी,
- रातभीत ही प्रकाशबाळे !

० ० ०

काव्य तरूंचा बागवान मीं ;
मळ्यांत माझ्या अमाप पीक !
अवघे जाते कर्जापोटी;
अन् माझी न कधी टळते भीक !

० ० ०

सौंदर्याने कधी काढिली
नीतीची जी छेड
तेव्हापासून कुळवंतीला
जडे तयाचे वेड !

० ० ०

अधरोष्ठावर अधोरेखिला
लेख तुवा जो घाईघाईत !
अर्थ उलगडे आता त्याचा
– हाय ! लोटली अवघी हयात !

० ० ०

महाकवीची शकुंतला ती
सद्भाग्ये कधि कुणा भेटते;
'प्रियवंदा' तर गल्लोगल्ली !
सखि 'अनसूया' हाय- परि कुठे ?

० ० ०

व्यक्तविण्या निज भाव मनीचे,
कविता स्फुरते अधीर होते,
छंद दाबतो गळा तियेचा
–अन् व्यक्त होतसे काही भलते !

०

कविता चाले सम्राज्ञीसम
- छंद स्वतःला घे संभाळुन !
व्याकरणाचे नियम धावती;
– लगबग आणिक अर्थामागुन !

० ० ०

काव्यी माझ्या तरार फुलल्या,
कल्पतरूंच्या हिरव्या बागा !
–अन् आयुष्याच्या ओसाडीमधि,
ओलाव्याची तिळ नच जागा !

० ० ०

पंचविशीमधि पोक्त शहाणा,
अकाली सांगे ब्रम्हज्ञाना !
पन्नाशीवर वय गेल्यावर,
–गच्छेगिरीचा सुरू धिगाणा !
–पचविशीचा पुन्हा तनाना !

० ० ०

वार्धक्याच्या छायेखाली
निवांत करितो प्रीती आतां !

उन्माद नसे ! नसेल नखरा-
-असेल शांती - असेल कविता !

० ० ०

ओठावर मम अजून जळते,
हिमशीत तुझे चुंबन अवचित;

-भाळावर मम अजून जळते;
तप्त मुद्रिका त्याची शाश्वत!

० ० ०

विलास रात्रीचा नच सरला;
नशा निशेची नच ओसरली.

साखर-स्वप्नामधे तियेने
-अंगावर अन् शाल ओढिली!

० ० ०

वाल्या-आधी लिही वाल्मिकी,
-छंदाआधी ते रामायण !

-अर्थाआधी शब्द जोडिले; -
-भाषेआधी आणि व्याकरण !

० ० ०

सोमाराच्या नलिकेमधुनी
     –वारे जाती तिकडे इकडून

मेंदूमधली जाय ना बया! –
     –या कानातुन त्या कानातुन!

○ ○ ○

कविता माझी–कारागिरी मम–
     दोन बयांची झुंज चालली!

एकमेकींच्या उपटिती झिज्या ! –
     –लावी दादला हात कपाळी !

○ ○ ○

रंगसफेती करण्यासाठी
     कळकटलेल्या ताजमहाला; –

चुना –खराटा घेऊन हाती ;
     अहा ! बहाद्दर कुणी निघाला !

○ ○ ○

कायेच्या त्या काच–कपाटी
     प्रदर्शना जणु मने मांडिली !

तडफड–फडफड, सदा चालतां,
     काच तडकली ! फडफड सरली !

○ ○ ○

इरसाल कुणी बनेल बेरड
खुशाल घोरत शांत सुखात !
तडफडतो अन् साधक कोणी
नीति-अनीती भ्रमजालात ।

० ० ०

चिमण्या चंद्रा झिडकारोनी
माजावरली गंधवती ती;
उन्मादामधि कसल्या स्वर्गिय-
झेप घेतसे सूर्यावरती !

० ० ०

परमेशाच्या मंदिरद्वारी
द्वारपाल-द्वय उभे सदोदित;
'आस्तिक' 'आस्तिक' एक भजतसे;
अन् 'नास्तिक' म्हणुनी दुसरा गर्जत !

० ० ०

कुणाचीच कधी ओळख न पटे;
जग अवघे पर-परके वाटे.
अन् क्षणात अवचित, का कसे अन्-
-जन्मांतरिचे पटते नाते !

० ० ०

दुर्दैवाचा गर्व आगळा !
दुःख भोगणे हाही सोहळा !
-दुःखाचीही करण्या रोकड -
खुशाल रडणे काढुनी गळा !

० ० ०

दरवाजे मम सताड उघडे,
नसे कुणाचे मला वावडे !
खुशाल या रे आत गड्यानो !
वाऱ्यासम या ! भरा चहुंकडे !

० ० ०

काळोखाला शोधायाला
काडी ओढुन दिवा लाविला !
सांदीकोपरा दिवटी फिरवुन;
-काळोख कसा म्हणे; न दिसला !

० ० ०

दिमाखात ती पाप मिरविते,
सहज विभ्रमे कशि मोहविते !
अन् पुण्यवतीची नजर बापुडी-
-संकोचे भूमीवर खिळते !

० ० ०

भक्तांना जो कधि न पावला;
–सोमनाथ तो प्रसन्न झाला!
–मूर्तीभंजक महंमुदावर !
खजिने त्यावर उधळून गेला !

० ० ०

'मानव-मानव' कोणी म्हणती,
'परमेशाची' श्रेष्ठ कलाकृती;
असो बिचारी ! परि बा ईश्वर,
असे नराची प्रथम विकृती !

० ० ०

लेख लिहुनी ललाट भरले;
अजून भाकित बाकी उरले !
लिहिणाऱ्याने म्हणून लिहिण्या–
खुशाल माथे अन् आक्रमिले !

० ० ०

कुणा तरी रे सदा शोधिते;
पटे न ओळख, –हृदय ओढते !
त्रिखंड धुंडुन काढिन शोधुन,
माणुस माझे –मला हवे ते !

० ० ०

डोक्यामाजी ठुसठुस कसली ?
गोम मेंदुमधि कसली घुसली ?
        –आत शिरे परि पडण्या बाहिर,
अभिमन्यूसम वाट विसरली !

० ० ०

द्यायचे तरी देई टाकुन !
–खुशाल जा मज पायी तुडवुन.
        रे कुलवंता – कुलटा म्हणुनी,
–कशास देसी उगाच दूषण !

० ० ०

गोड असे परि गिळवत नाही,
कडू असे तरि थुंकवत नाही !
        –कडु-गोडाच्या खलांत रसमय–
जिभेस पळभर उसंत नाही !

० ० ०

कशी, कधी अन् कुठुनी येते;
झपाटते अन भुलवुनी नेते !
        दिव्य-भव्य अन् क्षणांत एका–
–तडिताघाते लिहवुनि घेते !

० ० ०

आकाशातिल दिवा फुंकुनी
अधिरपणे ती कोणी रमणी;
        अंधारामधि कुणा ओढिते?–
–अन् कोण बघत हा वाकवाकुनी ?

० ० ०

सुखाच्या पावलांत
        शिरे पापाचा काटा !
अन् दुःखाच्या पावलांस
        पुण्य दाविते दहा वाटा !

० ० ०

कृष्ण दावी अर्जुनाला
        विराट विश्वाचे दर्शन;
अंतरीच्या आरशांत,
        घडे मला जे रात्रंदिन !

० ० ०

जीवनात माझ्या जरी
        आभाळही मावळलं !
–हरपल्या तारकांची
        कशासाठी हळहळ !

० ० ०

शेजारच्या घरांतल्या
बोंबलाच्या वासावर
--जेऊनिया पोटभर ?
--काढू कसा जन्मभर?

० ० ०

चंद्रमुखी पौर्णिमा
अन् तारामुखी अमावास्या !
दोघीही माझ्या सख्या–
– माझ्या लाडक्या !

० ० ०

साऱ्या दिशा,-
सूर्याला सारख्याच–!
साऱ्याच दिशांना–साऱ्याच दिशांनी,
तो चालतो !

० ० ०

सत्याच्या पांगळ्या पायांना
आंधळ्या सत्तेचा आधार,
नेहमीच हवा असतो.
–पण तो क्वचितच् मिळतो !

० ० ०

जीवनांत काहीच
वांझ नसते !

रणांतही नसते,
—काही एक वांझ !

० ० ०

आस्तिकांच्या मेळाव्यात
नास्तिक मी-'नास्तिक' मी !

नास्तिकाच्या मेळाव्यांत
आस्तिक मी—'आस्तिक' मी !
-खचित् 'आस्तिक' मी !

० ० ०

धरितो कोणी कृष्णकन्हैया
गोवर्धन-गिरी करांगुलीवर !

-कोणी अवघ्या सृष्टि सतीला
तशी तोलितो शिवलिंगावर !
-अन् कुणी आधुनिक-निजलिंगावर !

० ० ०

दिसो न मुखडा पुन्हा दर्पणी-
ठिकऱ्या- ठिकऱ्या केल्या म्हणुनी !
तेव्हापासून हजार तुकडे-
-हजार मुखडे,
-वेडावित मज वाकवाकुनी !
-वाकोल्यानी !

० ० ०

इच्छा-जन्म काही हाती नव्हता !
-आता निदान इच्छा -मरण तरी लाभू दे !
-पण तेवढंही भाग्य अधिकच दुर्लभ !

० ० ०

मिटलेले डोळे,
आपले आपल्यालाच-
बघायला कसे मिळणार?

-अगदी
समोर आरसा धरला तरी !

० ० ०

एकलेपणा-
कधी संपतच नाही !
-एकाचे दोघे झाले तरी नाही !
-कदाचित तो वाढतोच !
-अन् जाणवतो तर खचितच !

० ० ०

नाकारतां-नाकारता—

आकारले—आकारले !

आकारले त्या हाकारले !

'हो 'कारले !

अन् होकारूनी नाकारले !

० ० ०

माझ्या मागे-पुढे

सावली कधीच धावत नाही;

—कारण,

मीच स्वतः

सदा अंधारातच

चाचपडत असतो !

० ० ०

गिरी-कुहरांमधि स्वस्थ झोपली
हिंस्त्र श्वापदे मन्मनांतली !
उगाच त्यांना खडे मारुनी
कोस डिवचूं !—जाय आपुली !
—निमूट चाल गे वाट आपुली !

० ० ०

अंग,

पोपटाशी

एवढी सारखी

बडबड करतेस ?

त्यांतले

चार-दोन दाणे तरी

—माझ्यापुढे

टाकलेस तर ?

० ० ०

जितकी जवळीक अधिक,
-तितकंच दूरपण-अधिक !
-अधिकच अनुल्लंघ्य !
-विशेषतः एकशय्येवरलं !

० ० ०

मानलेल्या भावाचं
जर एवढं कौतुक;
-तर मग मानलेल्या नवऱ्याचं
-का नको ?

० ० ०

मी आलोय तुझ्याकडे
-एक लहानशी भेट घेऊन;
-माझ्या हातातल्या तबकामधे
-माझा मुखडा हसतो आहे !

० ० ०

वेणीमधि सोनचाफा
अंगकांती केवड्याची !
-करी मुलायम-मृदुल मखमली
-सुरी चमकते सोनियाची !

० ०

भार स्वातीच्या ढगांचा
एकदाचा उतरला;
–अन् इवल्याशा शिंपलीला;
असह्य आता तो झाला !

० ० ०

मागे काहीही झालेलं असो;
पुढे काहीही होणार असो;
हे–जिचे तिला–
–तिलाच समर्पण असो !

० ० ०

मनांतल्या मनांत,
जना–वेगळ्या जगात–
–कोणते म्या सोडियेले
पाप कधी अनाघ्रात?

० ० ०

सत्याने जइं सुंदरतेला
उगाच काही बाही पुसले;
अन् उगाच त्यावर सुंदरतेने
खुशाल उत्तर काही दिधले!
–तेंव्हापासून हे प्रश्नोत्तर
'कविता'–नामे अमर जाहले !

० ० ०

अंगकांतिचे वसन लेवुनी,
उन्हात बसली
—कुणी न्हालेली, !
केस उदवीत
उन्हात बसली,
कुणी न्हालेली ;
अंगकांतीचे वसन ल्यालेली !

० ० ०

आसक्तीच्या रसातळामधि
डुंबडुंबुनी बुडता बुडता ;
अनासक्तीचा ठाव लागला !
—कसली आता आम्हा चिंता !
आसक्तीच्या—शृंगाराच्या
सर्पावरुनी चढतां चढतां ;
तुलसी चढला सदेह स्वर्गी !
—[अन् शय्येवरती रडते कांता !]

० ० ०

कोळिष्टक ते झाडुन केवळ
वात कशी ती जळणे पुढती?
तेल संपले पणतीमधले !
—टाक मालवुन वेळेवरती !
तेल संपले पणतीमधले
वात कितीशी थरथरणार ?
टाक मालवुनी वेळेवरती,
— घाण अरेरे, सुटेल ना तर !

० ० ०

आयुष्याच्या वाटेवरती;
वळणावरती - वळणावरती!
—सुखे किती किती टपून बसती !
दबा धरूनी—टपून बसती !
—वाटसरूची वाट अडविती !
—दु:खाइतुकी सुखेही किती
टपून बसती
सुखेही किती !
—दु:खापरती !

० ० ०

आत्मा म्हणे—
माझं मढं;
मीच वहातो;
—माझ्याच खांद्यावर.
—जन्मभर !

जन्मभर—
वेठ बिगार !
वेठ बिगार !
मढ्यांची
—आत्म्यांची !

० ० ०

## अच्युत

कुब्जा :-

च्युती सेविकेची,

च्युती शूद्रिकेची,

—च्युती—नच ती अच्युताची !

राधा :- च्युती मोहितेची,

च्युती ती सतीची,

—च्युती—नच ती अच्युताची !

गीता—च्युती शंकितांची ,

च्युती वंचितांची;

च्युती ...... नच ती अच्युताची

० ० ०

मी

पापही करीत नाही;

अन् पुण्यही करीत नाही !

मला

माझ्या वाट्याची

सुखं—दु:खं

भोगावयाची आहेत !

—संपूर्णपणे

आनंदाने

—समाधानाने

—माणसासारखी !

० ० ०

दोन पायांवर
उभा आहे तोवर
माणूस तो खरोखर
        —माणसासारखा.

चार पायांवर
आला, की झाला नर
वखवखलेला क्रूर !
—विचारा स्त्रीला !
        मादीला !

० ० ०

मी
    माझ्या खोलीत गेलो;
    साऱ्या खिडक्या बंद केल्या;
    दारंही लावून घेतली,
    कडी —कोयंडा पण घातला.
    —अन् आता मी रडतोय !
    —मी रडतोय-माझी चोहोकडून
        —कोंडी झाली म्हणून !

० ० ०

अनादी......अनंत
        पसरल्या दिशा
        हातानी इवल्याशा,
        कवळू तरी कशा?
अनादी......अनंत
        काळ वेगे धावतो
        —वळुनी ना बघतो !
        —त्या थांबवू तरी कसा?

० ० ०

दुःख एकच        – ना मृत्यूचे,
खंत एकच        – ना कष्टांची;
               – ना क्लेशांची,
               – ना पराभवाची
व्यथा खरी;
व्यथा खरी;      – वैय्यर्थाची !
               – निरर्थतेची

॰ ॰ ॰

आनंद
गगनांत मावत् नाही;
तेथून तो खाली उतरतो.
अन् मग
तेथूनच
माणसाच्या साऱ्या दुःखांना
प्रारंभ होतो !
–अन्
साऱ्या सुखांना सुद्धा !

॰ ॰ ॰

स्वतःच रचिली कबर स्वतःस्तव
प्रशांत, सुंदर, प्रशस्त अभिनव !
–अन् जिवंत घेता शांत समाधी,
–वृथा कशास्तव फिर्याद आता?
–एकलेपणाची कां चिंता?

॰ ॰ ॰

स्वातंत्र्याच्या – समानतेच्या
उदघोषांमधि–उन्मादांमधि !
रस्त्यांमध्ये —गल्ल्यांमध्ये
–बनली ज्यांची मने मवाली !
–त्यांच्यासाठी तुटतो तिळतिळ
जीव बापुडा
–उगाच माझा !

० ० ०

नवं दुःख
जुन्याच ओळखीने
–इतक्या सलगीने
–इतक्या अंगचटीला
का यावं ?
अगदी नव्यातलं नवं दुःख
–इतक्या जुन्या ओळखीचंच
कसं निघावं ?

० ० ०

मीं केवळ साक्षी;
        –सर्व साक्षी !

–पण मी माफीचा साक्षीदार?
        जे न देखे रवी,
        –ते बघणारा कवी !
            –पण नुसताच बघणारा !

० ० ०

अमावास्येच्या नीलिमेमधील
        कोटी कोटी तारकांचे !
        लखलखते तारांगण !

–ते त्या रातभीताला कस दिसणार?

–अन् हा म्हणे 'स्वर्गसाक्षी'
        –सूर्य नारायण !

० ० ०

काळोखाला घाबरणारी,
                'प्रकाशपूजक' मुले म्हणविती;
'तमसो माऽऽ ज्योतिर्मय'
                भिऊन पळता पळता म्हणती !

[अन सूर्या मागे धांव–धावता
                भयाचीच परि गूढासक्ती
                –मूढासक्ती! ]

० ० ०

# पायवाट

पायवाट,
— राजरस्ता संपतो ;
तिथे सुरू होते ती !

पायवाट,
— पायाना जमिनीवर
फुटते ती !

पायवाट,
— घरा-घरांतून
निघते ती !

पायवाट,
घरा-घरांपर्यंत,
— पोचते ती !

पायवाट,
—पाय थकले
तरी थकत नाही ती !

पायवाट,
— पायांनी कितीही चाललं,
तरी बुजत नाही ती !

पायवाट,
— पायांनी चाल चाल चाललं,
की तितकीच पक्की होते ती !

पायवाट,
    – नेहमीच जमिनीवरून,
        सरपटत जाते ती !

पायवाट,
    – आभाळात (-स्वर्गात)
        जात नाही ती !

पायवाट
    – पाण्यावर वहावत
        जात नाही ती !

पायवाट,
    – पाय असतील
        तोपर्यन्त,
        सोबत करते ती !

पायवाट,
    जी कुठे सुरू होत नाही;
    अन् जी कुठे संपत नाही ती
        –ती पायवाट !

○ ○ ○

## साक्षी

डोळे माझे
सताड उघडे !
-आजन्म
-आमरण
-अष्टौप्रहर
-तिन्ही -त्रिकाळ.

बघतो हवं ते-टकटका,
बघतो नको तेही-टकमका !
साक्षी-सर्वसाक्षी
-पण त्या त्या क्षणाचाच केवळ
-अन् त्या त्या क्षणापुरताच !

दर क्षणी-
पुसतो पाटी-
जुन्या जात्या क्षणाची

दर क्षणी-
कोरी पाटी-
नव्या येत्या क्षणासाठी !
अन् म्हणूनच आहे टिकून !
मी अजून !
-मी आरसा !

० ० ०

कोवळ्या
किरणांची कोवळीक !
विचारा अंधाराला !
-बिचाऱ्या अंधाराला !

घाव पडला त्याच्यावर !
जखमा त्याच्या उरावर-(वर्मावर)
-रक्त सांडतय् त्याचं! अंधाराचं!

-पण उजळताहेत दिशा;
उजळतेय् उषा!
-तिच्या गालांवर
अंधाराच्या बटा !
-तिच्या डोळ्यांवर
काजळाच्या छटा !
-तिच्या मस्तकावर
घनदाट लाटा !

त्यावर चमकताहेत, नाचताहेत कोवळी किरणं

-अंधाराच्या भळभळत्या जखमांवर-

० ० ०

# आरसा

आरशाला,
लांबी असते,
रुंदी असते,
जाडी मात्र नसते

अन् खोली ?
— असते,
-पाताळाएवढी !
— आभाळाएवढी !
अंतराळाएवढी!

पण तितकं— खोल खोल
वाकून वाकून बघणारा मात्र हवा !

बघणारा बघेल,
तितकं दिसेल !
-अगदी तितकंच !
— कमी नाही अन् जास्तीही नाही !

वाकू तितकी—
बघू तितकी खोली-!
-आरशाच्या सपाटीवर !

० ० ०

# आवडी

आवडलं ?

-हो;

समजलं ?

कुणास ठाऊक!

आवडणं (नावडणं)

म्हणजेच खरं समजणं !

मला आवडतं;

-तेवढंच मला
पुरेसं आहे.

ते असंच सदा

आवडो;-आवडत राहो;
-आवडत-नावडत राहो !

समजलं नाही तरी,-

काही मोठंसं
-बिघडत नाही !
-अन् अडत तर मुळीच नाही!

○ ○ ○

तव दुःखांच्या खांद्यावरती,
मान टाकुनी
विश्रब्धपणी;
कुजबुजलेल्या
–गुज गोष्टींची
–सुख–स्वप्नांची
–रात रंगली !
–रात जागली!
–रात उजळली
कुजबुजलेल्या–गुज–गोष्टींची,
रात्र पहाटली !
नव दुःखांच्या खांद्यावरती
मान टाकुनी
विश्रब्धपणी–
रात पहाटली !

० ० ०

माणसांत मी तुला आणिले
दगडातुन तुज देव बनविले !
–तरी मग्रुरी तव ही इतुकी
व्रण छन्नीचे अजुन न बुजले !

व्रण छन्नीचे अजुन न बुजले ;
छन्नी-हातोडा अजुन न थकले !
–बाहुबलाने उडविन ठिकऱ्या
- ज्या हातानी तुला घडविले !

० ० ०

तरून जायचे नच भव-सागर
–यथेच्छ डुंबायाचे मजला !
डुंबण्या हवा मज भवसागर !
-मम भवसागर !

० ० ०

# मोह

षड्रिपूंपैकी
        जर कोणता
        माझा सर्वात आवडता असेल,
                —तर तो मोह !
—त्या मोहाची मोहिनी
            मला सतत पडलेली आहे !
—आणि ती मोहिनी
        मला अशीच
        सतत पडत राहो!

• • •

# येशू

यशूचा जन्म झाला,
गव्हाणीमध्ये.
पुनर्जन्म झाला—
—क्रूसावर !
अन् येशूचा खरा अंत झाला रोममध्ये !

रोममध्ये त्याचा अंत केला,
तो सीझरने नव्हे;
—तर पोपने !
—खुद्द पोपनेच त्याला सुळी दिले!
—पण कॅल्व्हरीवरील क्रूसावर
येशू अजूनही
(बुध्दासारखा)
कसा शांत शांत आहे !
पण रोममधील—
व्हॅटिकनमधील क्रूसावर
येशू सारखा तडफडत होता;
शत वर्षे—सहस्त्र वर्षे !

—पण अखेर येशूची तडफड थांबली
—ती दिल्लीमध्ये !
—३० जानेवारी १९४८च्या गोरज मुहुर्तावर!
—तेव्हापासून बुध्द आणि येशू;
—त्यांच्या संगमाचे पवित्र स्मारक
—राजघाटावर
जिवंत उभे आहे !

...

## डोहाळे

मवाल्याला–
गृहस्थीचं स्वप्न !
अन् गृहस्थाला–
मवालीपणाचे डोहाळे !
कुलवंतीलासुद्धा–
मवालीपणाचेच डोहाळे !

–अन् स्वप्नस्थाला
सगळ्या–सगळ्यांचेच !
आलटून–पालटून,
–सर-मिसळून
–घोकून–घोटून
–सगळ्यांचेच
–सगळ्यांचेच डोहाळे! –
–स्वप्नस्थाला !

० ० ०

एक डोळा
खिळला स्वर्गावर;
–आशेनं !
एक डोळा
खिळला नरकावर
–भीतीनं !

अन् या सुंदर सृष्टीकडे बघायला,
आम्हाला
-दोन डोळ्यांची
दृष्टी मुळी उरलीच नाही !

० ० ०

जाणतेपणी
जन्मात कुणाच्याच कधी पाया पडलो नाही !
-पण कधी कधी वाटतं,
-उगाचच-
की एकदा तरी,
तात्यांच्या पाया पडलो असतो-
-तर बरं झालं असतं !

० ० ०

## –संत–कवी !

पराभवाचे शल्य बोचते
पापामधी मन सदैव पिचते;
निरर्थतेची भयाण जाणीव–
जीवनास मम व्यर्थ ठरविते !

पराभवाच्या वैषम्याची,
पापानंतरच्या शरमेची,
असह्य संतत व्यथा निर्मिते–
–मनी अहंता ! न कळे कुठची ?

पराभवाचे शल्य बोचते
लेखणीस ते धार पाजते!
–बुडवुनि रुधिरी तेच शल्य अन्–
–कविता कसली कुणा लिहविते !

पापांमधि मन सदैव पिचते,
जाणीव पश्चात्तापी रमते !
–संतपणाची वृथा अहंता–
पाप–कर्दमी मंगल फुलते !

जीवनांत जे व्यर्थच ठरले
परम अर्थ त्या अहा गवसले !
-निरर्थतेतील त्या अर्थास्तव–
कविता-जीवन कृतार्थ ठरले !

० ० ०

## मायाविनी

कशी बोलविते, कशी खुणावते,
काळीज भये परी कापते !
नजर समोरी, लक्ष पाठीशी;
पळू म्हणे तो खिळे भूमिशी !
नजर गोठते, क्षणही न बघते;
–बघितल्याविना परी न राहते !
जीव बचावुन पळुन जावया,
उठे न पाऊल प्रयास वाया

कशास आलीस हडळी येथे ?
मायाविनि तू माझ्या वाटे !

• • •

अखेर प्रत्यक्ष मरणापूर्वी,
तो कितीदा तरी मेला आहेच;–
–शेक्सपीअर म्हणतो
–त्याप्रमाणे !

पण प्रत्यक्ष मेल्यानंतर
पुन्हा पुन्हा
जन्मालाही आला आहे ! प्रत्येकदा– !
पुन्हा जन्मला तरच पुन्हा मरणार ना?
–पुनरपि जननम्
–पुनरपि मरणम् !

याच देही, याच डोळा
-पुन्हा पुन्हा मरणाचा हा सोहळा!
-पुन्हा पुन्हा जन्माचा हा सोहाळा!
पाहिला म्यां !
-पाहिला म्यां !
-म्या पामरे पाहिला !

० ० ०

नायक मुळी नसतोच;-
खल नायकही नसतोच.

विदूषकही नसतो;
नट-नटीही नसतात;
-अन् सूत्रधार तर नसतोच नसतो.

'पात्रे' नसतात,
-नुसतीच माणसं असतात !
रंगभूमी नसते,
-नुसतीच भूमी असते !
-अन् वेगळा प्रेक्षकवर्गही नसतो !
-सारे एकच सर मिसळ असतात.

-तरीही पण कुणी समजतो उगाचच;
-की मीच सूत्रधार !
-मीच नाचवितो
सारी पात्रं !
-कुण्या एका पात्राचा नसता अहंकार !
-फुकटा अहंकार !

० ० ०

# ओरखडे-

ओरखडे-
निघणारच असतील,
-तर ते गरुडानें काढावेत !
-सिंहाने काढावेत !
वाघाने काढलेलेही चालतील !
-पण गिधाडांनी मात्र नकोत !
-कोल्ह्यांनी तर नकोच नकोत !

ओरखडे
त्वेषाचे,
द्वेषाचे,
क्रौर्याचेही चालतील !
-पण वंचनेचे मात्र नकोत !
-रेशमाचे
-तर नकोच नकोत!

० ० ०

## टिकटिक !

रात्री-
एकदां का
घड्याळाची टिकटिक
ऐकू येऊ लागली;
की मग
दुसरं काहीच ऐकू येत नाही !
दुसरं काही एक सुचत सुध्दा नाही !
–आणि पुढे पुढे तर,
अगदी घड्याळ नसलं,–
तरीसुद्धा टिकटिक ऐकू येतेच !
–सतत ऐकू येतच रहाते !
जणू घड्याळ आंत आंतच,
कुठे तरी अगदी अंतरंगातच
टिकटिक करीत असतं!
–रात्री-एकांती
रोज रात्री-एकांती!

० ० ०

फेसाळल्या पाण्यावरी
सात सात पावलावरी–चालल्ये मी!
–चालल्ये मी

स्वर्गाच्या वाटेवरी,
आभाळी ढगांवरी,

रुपेरी कडांवरी- चालल्ये मी !

—चालल्ये मी !

चालल्ये मी येशूसंगे !

चालल्ये मी येशूसंगे !

प्रकाशल्या मुखावरी
सोनारल्या केसांवरी

—फिरली बोटे!

फिरली बोटे!

शहारल्या अंगावरी,

बहरल्या भांगावरी,

—फिरली बोटे येशूची,
—माझ्या येशूची!

० ० ०

मी
चंद्रावर गेलो;
—तिथे सशाची शिंगे नव्हती !
—विवरं होती !

चंद्रावरून,
चंद्र चंदेरी दिसत नव्हता !
दिसत होता तो
—रेताड, वैराण, भयाण, ओसाड !
—मात्र तेथून
—चंद्रावरून आपली पृथ्वीच
किती किती सुंदर, अल्हादक,
तेजोमय, चंद्रमुखी दिसत होती !
—शेवटी
ही आपली घरची—
—चंद्रमुखीच बरी !

० ० ०

## पापभीरू

हे पापभीरू?
–'पाप' 'भीरू' म्हणता म्हणतां —
–हे होतात 'सौख्य-भीरू' !
–अन् पळतात दूर दूर सुखापासून !

अन् सुखापासून
दूर दूर पळता पळता;
हे दुःखालाच पुण्य समजू लागतात !
–हे पापभीरू !
जेवढं दुःख तीव्र, तेवढंच पुण्य अधिक !
इथल्या या पृथ्वीवरच्या दुःखाची किंमत रोख मोजून
हे पापभीरू पुण्य खरीदतात !
–स्वर्गातलं!
–हातचं सोडून पळत्याच्या मागे लागणारे
–हे पापभीरू !

० ० ०

आंधळ्याला
अंधारांत दिसतं;
–जे डोळसाला –
उजेडातही दिसत नाही!
–बघण्यासाठी
फक्त डोळेच नसतात !
–अंग-अंगाने
–अनंगानेही बघता येतं !
भावता येतं !
–अन् जे भावलं,
–तेच खरं दिसलं !

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ..........
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# मोह-एकेकाला

मोह !
    -एकेकीला एक एक !
मोह !
    -अहेव मरणाचा !
मोह !
    -भरल्या मळवटाने
    चितेवर चढण्याचा !
        -चंदनाच्या चितेवर !
अन् मोह !
    -एकेकाला एक एक
मोह !
    -अहेव मरणाचा !
मोह !
    -फाशीच्या तख्तावर चढण्याचा !
मोह !
    लक्ष्मण झूल्यावरून
    गंगेच्या खळखळणाऱ्या
                वेगवान
    शीत-धवल प्रवाहात-
    हा नश्वर देह झोकून देण्याचा !

मोह !

काशीच्या घाटावर
गंगेच्या पवित्र डोहात
शीत–समाधी घेण्याचा !

मोह!

अहेव मरणाचा
–वृथा हौतात्म्याचा !

अन् मोह !

विषकन्येच्या लुसलुशीत मिठीचा !

मोह !

–सोन्याच्या सुरीचा

मोह !

–राजस हौतात्म्याचा !

मोह !

एकेकाचा

मोह !

एकेकाचा–

मोह !

एकेकीचा– मोह !

० ० ०

## शब्द क्षमेचे

रक्त ठिबकले क्रूसावरती,
मातीमध्ये ओघळ जिरले;
–अन् शब्द क्षमेचे हवेत विरले !
सहस्र सहस्र वर्षांनंतर
सहस्र सहस्र कोसावरती !

माझ्या भरतभूमीवरती
फुलले हास्य शिशूचे !
        –हास्य शिशूचे !
        उगा अकारण
        स्निग्ध निरागस
        अव्याज–मनोहर !

–अन् दंतहीन त्या बालछबीवर
        पुनरपि उमटले
        ' निःशब्द ' क्षमेचे !
        सुहास्य वदने हात जोडिता,
        छातीवरती फुलें झेलतां

रक्त ठिबकले
–ओघळ जिरले
शब्द क्षमेचे हवेत विरले !
        या भूमीवर
        भरत भूमीवर
सहस्र सहस्र वर्षांनंतर

पृथ्वी
फिरतच आहे;
मी स्थिरच आहे !
-पृथ्वीला बिलगून-
घट्ट-घट्ट !

पृथ्वी
फिरतच आहे !
-भिरभिरत आहे,
-झोकांडत आहे,
-कलंडत आहे,
-भेलकांडत आहे,

पण मी स्थिरच आहे !
शांतच आहे,
त्याच पृथ्वीवर
-पाय घट्ट-घट्ट रोवून !

• • •

## धूम

अग्नि धुमसतो ; अन् प्रकाशतो !
ज्वालाकर परि आखुड पडतो
                    —अग्नीचा संदेश दशदिशा—
धूम एकला कसा पसरितो !

जरि संदेशा धूम पसरितो !
तेज, उष्णता, देऊ न शकतो !
                    —अन् समर्थ होईल काय बापुडा ?
—नव वन्ही कधि चेतविण्या तो ?

• • •

## डबकं

—टीचभर डबक्यांत
                    आभाळाची खोली !
—बघणारा मात्र हवा—
आभाळातली—फुलं
                    डबक्यांत उगवतात !
नाचतात, हसतात
                    —खुणावतात सुद्धा !
—पण ती खुडता—
                    हुंगता मात्र येत नाहीत !

• • •

## वर आणि शाप

वर–

म्हणजे वशिला !
–भक्ताने परमेश्वराकडे लावलेला,
–पण वशिलाच !

अन्

परमेश्वर म्हणजे
भक्ताची लाच खाऊन,
निसर्गाचे कायदे मोडून,
वशिला लावणारा सर्व सत्ताधीश !

अन् शाप म्हणजे सूड !
वशिल्याने उगविलेला पण सूडच !
–परमेश्वरी कृपेने
निसर्गाचे नियम मोडून,
उगविलेला बेकायदा सूड !

वर किंवा शाप
देणारा जर कुणी असेल,
तर तो नक्कीच
लाच खाऊ–स्तुतिप्रिय–हलक्या कानांचा
खुनशी सत्ताधीश असला

त्यालाच म्हणतात परमेश्वर !
त्याने दिलेला वर (किंवा शाप)
म्हणजे त्याने स्वत:च केलेल्या
कायद्यांचा भंग !

ज्याचा वशिला लागतो
तो चमत्कार करू शकतो !
तो संत—
—चमत्कार करणारा !
—तो साक्षात्कारी !
—लाच देणारा
—वशिले लावणारा !

ज्यांचा वशिला लागत नाही
ते सामान्यजन
—पाप—पुण्य करणारे
—सुख —दुःख भोगणारे
—इतरे जन !

० ० ०

# नित्य नव्या प्रेतांमध्ये

नित्य नव्या प्रेतांमध्ये
–जुनाच जीव !
 –धुगधुगतो आहे,
 –कुडकुडतो आहे,

–नित्य नव्या प्रेतांमध्ये जुनाच जीव !
  धगधगणार आहे
  धडपडणार आहे
 –नव्या प्रेतांमध्ये जुनाच जीव !

  जुनाच जीवात्मा
  मुक्तीसाठी,
  मोक्षासाठी
–पुन्हा पुन्हा नव्या नव्या
  प्रेतांचा आश्रय शोधणारच आहे !

  जुनाच जीवात्मा
  अनादि-अनंत जीवात्मा
  मुक्तीसाठी
नित्य नव्या भंगुर प्रेतांच्या शोधात
 वणवण भटकणार आहे !
चौऱ्यांशी लक्ष प्रेतांचा 'वास'
  पुरा झाल्यानंतरच,
त्याचा प्रवास थांबणार आहे !
  –म्हणतात–थांबणार आहे.
  –कुणास ठाऊक?

० ० ०

एका कानानं
ऐकावं,
अन दुसऱ्या कानानं
सोडून द्यावे !
हा हितोपदेश
ऐकायला तरी
गोड लागतो !

पण प्रत्यक्षात मात्र
तसं काही घडत नाही.

एका कानानं
ऐकू नक्कीच येतं;
–पण दुसऱ्या कानानं
सोडून मात्र देता येत नाही !
–दुसऱ्या कानानेही
ऐकूच येतं !
–ऐकूच येत रहातं !

० ० ०

## त्वया सृष्टम्

इकडे ,–

इकडल्या मुलुखांत तरी
 दिसायला बरी ;
नव्हे ,– कदाचित सर्वांगसुंदरी !
–स्त्री जातीची लाडिक , लोभसवाणी प्रतिमा

गोरी
गोऱी
हेमांगिनी ! –एका काळची तरी खचित !
 सडपातळ; पण सुडौल बांधा !
 हवी तेवढीच उंच
 हवी तेवढीच गोल
 स्थूल–हवी तिथंच !

नाकी डोळी नीटस ,
नाकी कोवळी चाफेकळी.
नाजुक स्पंदनशील.
 डोळी भोळी भाळी
 –पण नजर?
 मधुर; मधाळ;
 मधूनच खटयाळ;
 अन् बेरकी, सतत शोधणारी.

जिवणी नाजुक
ओठ ओशट
हाताची बोटे दळदार लांबट–
तळवे–तांबूस (निदान एकदा होते केव्हातरी)
–आता घामट –मेणचट, कामसू
–पण निबर मात्र नाहीत.

एकूण छबी
लोभस, मोहक
कामानं घामानं भिजलेली.
–पण म्हणून जास्तीच लाघट !
–बघणाऱ्यांच्या लोचट लंपट नजरेला तरी !

परकर–गरारा ? म्हणा घागरा
ढोलदार उनाड उघडया पावलांवर
भिरभिरणारी भिंगरी !
चाल कबुतरी छुम छुम
वाळयांचा चाळा
बगळयांच्या माळा
आकाशांत भरारणाऱ्या !

लांबसडक केस
मऊ मुलायम –रेशमी
म्हणजे–होते एकेकाळी !
आता (झालेले ) लोकरी !
तैलहीन , कांतिहीन !

केसांचा सैल अंबाडा–
मानेखाली ओसंडणारा , ओथंबणारा
गेंददार , भरदार , जाडजूड अंबाडा !

रेशमी ; लोकरी
सैल अंबाडयाच्या डोईवर
-डोईवर पाटी भलीमोठी !
पाटीत डबा; डब्यांत? डब्यात-?
-हवं काय ते म्हणा-
म्हणतो तर,
प्राकृतामध्ये म्हणा-'मैला'
-म्हणा- संस्कृतमध्ये-विष्ठा !

विष्ठा-
ब्राम्हणांची- सवर्णांची !
-ब्राम्हण्याची-चातुर्वर्ण्याची
-वर्ण- श्रेष्ठत्वाची !

-विष्ठा- !
भरगच्च
शिगोशीग
भरभरून-डचमळून
हिंदकळून ओसंडणारी
ओथंबणारी !

-विष्ठा !-
-अस्पृश्यता नष्ट केलेल्या
भारतीय संविधानाची, -विष्ठा !
भारतीय संघराज्याची ! विष्ठा !

-विष्ठा-
चार पुरुषार्थांची
मोक्षमार्गांची -पावती मुक्तीची !
मानव (देह) धर्मांची महत्ता !
अहंता !

येशूने
सान्या जगाचे पाप,
सान्या पापांचा भार,
घेतला होता आपल्या शिरावर !
-त्याला क्रूसावर
ठोकून ठोकून
खिळवून टाकला
-काटेरी मुकुटासह !

हजारो वर्षं झाली !
-तरी -तो भार
येशू-अजूनही वहातोच आहे,
रक्ताळलेल्या काटेरी मुकुटासह
रक्ताळलेल्या-खिळलेल्या तळव्यासह

-अन् ही श्रम-सुंदरी
विष्ठावंती,
चातुर्वर्ण्याच्या पुण्याईचा भार,
अजूनही वहातेच आहे !
-पुराणकालापासून
पुरुषसूक्ताच्या-पदस्पर्शाने ती पुनीत झाली-
तेव्हापासून- !

-वर्षानुवर्षं
-शतकानुशतके
-युगानुयुगे
-ही विष्ठावंती आपल्या डोईवरील मैला
वहातेच आहे !

कोण्या पुण्यवंतांच्या पुण्याईने !
-कोण्या कोपिष्ट द्रष्टया ऋषींच्या शापा-
पासून !
-तिच्या पापाला शाप मिळाला तेव्हापासून;
तिच्या पुढील ४२० पिढ्या;
नरकात पडल्या
-तेव्हापासून !

आणि
कुण्या पुण्यश्लोकांच्या
पुढील ४२० पिढ्या
-स्वर्गात रममाण व्हाव्यात, एतदर्थ!
-अन् प्रत्यक्ष भगवंत युगांयुगांत-
अवतार घेतोच आहे !
—वर्णसंकर टाळण्यासाठी !
—कुलस्त्रियांच्या संरक्षणासाठी !
प्रत्यक्ष भगवंत अवतार घेतोच आहे!

-नव्या चातुर्वर्ण्याला
जन्माला घालण्यासाठी!
पुन्हा पुन्हा जन्माला घालण्यासाठी!
प्रत्यक्ष भगवंत अवतार घेतोच आहे

'चातुर्वण्यम् मया सृष्टम्'-
होय भगवन् ! चातुर्वण्यम् त्वया सृष्टम् !
होय, होय, भगवन् !
त्वया,-त्वया पृष्टम
-त्वया स्पृष्टम
तूच-तूच-तूच तो !

—आणि तोवर—
इकडे
इकडल्या मुलूखात तरी—
दिसायला बरी
नव्हे-कदाचित् सर्वांगसुंदरी—

स्त्री जातीची लाडिक लोभसवाणी
प्रतिमा,—
डोईवर पाटी,
पाटीमध्ये डबा,
डब्यामध्यें मैला !
—मैला वहातेच आहे !
—वहातेच आहे !
—श्रमसुंदरी !
—वहातेच आहे मैला !

—आणि आम्ही पहातोच आहोत तिला;
लोचट—लंपट नजरेने !
आम्ही पहातोच आहो,
तिच्या डोक्यावरली पाटी,
—थिजलेल्या डोळ्यांनी !

• • •

## सानपाखरें मळ्यात माझ्या

सान पाखरे मळ्यांत माझ्या
सांज सकाळी येत कितीतरी !
उन्हात कोवळ्या येऊनी बसती
थवे थव्यावर; थवे थव्यावर!
गोंडस लाडिक डौलदार किती;

गोजिरी; साजिरी, मोहक भुरटी !
इवली इवली विचित्र रंगी,
किलबिलणारी, चिवचिवणारी
अन् भरारणारी भुरर्र-गगनी
सान पाखरे मळ्यात माझ्या
सांज सकाळी येत कितीतरी !

मी नच त्यांना हाकलणार !
गोफण फिरवुन ना बुजगावुन
कधीच नाही कधीच ना कधी !
भले मलाही फस्त करो ती!
—फुले-फळे अन् पाने–पाने !
सान पाखरे मळ्यात माझ्या;
सांज सकाळी येत कितीतरी !
उन्हात कोवळ्या येऊन बसती
थवे थव्यावर थवे थव्यावर
सान पाखरे मळ्यांत माझ्या !

० ० ०

## केव्हा रात्रीच्या एकांती

केव्हा रात्रीच्या एकांती
चित्त माझे चाळवते
निद्रेच्या अन् जागृतीच्या
मध्ये खुळे घोटाळते !

अर्थ गूढ ग्रंथातले
नवा आशय बोलतात;
काव्यांतल्या मुग्ध शब्दां
पंख नवे फुटतात !

पानांतुनी उडुनी येती
असंख्य कल्प-कथातल्या;
नाचत हसत रडताती
किती बाहुले अन् बाहुल्या

भिंतीवरी टांगलेल्या
चौकटीतल्या मुखाकृती !
ओठ हळु हलताती
डोळे हळु चमकती !
लेण्यातल्या भव्य मूर्ती
हळूच पुढे सरकती !
थिजलेले डोळे त्यांचे
करुणाभरे ओलावती !
वीणेमाजी गुंडाळलेले
मधु-मंजुळ सप्तस्वर;
मुक्त होतां नभा भिडती
—पाझरले जणु चंद्रकर !

केव्हा रात्रीच्या एकांतीं
चित्त माझें चाळवते;
निद्रेच्या अन् जागृतीच्या
मध्ये खुळे घोटाळते !
अन् हाय! कधी संशय काळे
मनी शंका ज्या कोंडल्या
स्वप्न-स्वर्गातही येती !
झाकळती त्या सावल्या
–यमलोकी जा, स्वर्गीं वा जा ;
भुते परी भित्यापाठी
दिवसा ढवळ्या उन्हांतही
भित्यां मना भेडसावती
अवसेच्या काळोखाची
भुते माझ्या ओळखीची
पुनवेच्या पऱ्या परी
कुणा ठावे रीत त्यांची ? . .
केव्हा रात्रीच्या एकांती
चित्त माझे चाळवते;
निद्रेच्या अन् जागृतीच्या
मधो मधी घोटाळते !
–कुठे कसे खुळावते !
–खुळावते !

० ० ०

## –माफीचा साक्षीदार

मी
माफीचा साक्षीदार !
हवी तशी साक्ष देणारा
शपथेवर !

मी
शपथेवर
विश्वासघात करणारा,
–चार भिंती आडच्या
सांगणारा–
–अगदी शय्येवरल्या वित्तंबातम्या
गुजगोष्ठी सुध्दा !
कुजबुजणारां' !

अगदी
स्वत:शी सुध्दा
एकांती अंधारात सुध्दा
कुणी कबूल न केलेल्या–
गोष्टी बेलाशक सांगणारा ! –

मी
माफीचा साक्षीदार !
शपथेवर बोलणारा–
कवी !

## एकलेपण

माझ्याच एकलेपणाच्या चक्रव्यूहात
मी बेधडक घुसलो :
अन् आत-आत-आत
जातच राहिलो !

आता आरपार निघूनही जाता येत नाही;
-अन् परतीची वाटही सांपडत नाही !
बाळा अभिमन्यो !
गर्भात ऐकलेलं
'उपजत' ज्ञान
-म्हणजे काही शहाणपणा नव्हे रे!

आता, चोहोकडून-पुरतं वेढून गेलेलं
हे घायाळ बाळ कोसळणार आहे!
-अन् शेवटची लाथ डोक्यावर हाणायला
जयद्रथ टपलेलाच आहे !

० ० ०

## जन्मठेप !

कसे मोजितो दिवस सजेचे
भिताडातिल एकांताचे;
जातिल रे ते कटुन कसे तरी,
ढकलित–ढकलित दिना–दिनांतरी !
परि सुटल्यावर-कशी सरणार
–जन्म–ठेप जी देई प्रभुवर !

दिवसामागुन दिवस धावती;
वर्षामागुन वर्षे सरती
–दुःख न अगदीं गत वर्षांचे
– उरली कैसी लवकर जाती ?

० ० ०

फुटलेल्या त्या वाटेवरती
मन वेधळलं , घुटमळले किती !
उठविलेले पाऊल आतुर–
काही केल्या न पडे पुढती !

जावे वाटत तिकडे तिकडे !
पाउल परि कां नाही उचलत ?
राहावे की वाटत इकडे
मन व्याकुळ परि इथेहि न रमत !
वाटेशी त्या वाटाघाटी
सतत चालल्या तेव्हापासुन!

–अन् वाटाड्यानी वाट मारण्या
केली गर्दी सावज होउन !

० ० ०

सत्य मला सांगायाचे,
सत्य पुरे; –परि नच शपथेवर !
सत्य मला सांगायाचे;
–तलवारीच्या नच धारेवर !
सत्य न निसटो म्हणुन जयांनी
स्वये बसविली घट्ट दातखिळ !
मौनव्रताचा डंका त्यांचा–
–असत्य अवघे त्रिभुवन घुमविल !

० ० ०

'रक्षिन तुज मी, नको घाबरू'!
–ऋृ एकदा अनृत वदले !
काय करावे ऋृते बिचाऱ्या ?
–कोण अनृता रोखू धजले ?
सत्य निरुत्तर हसूं दाबते;–
भाषण करण्या अनृत उठले;
अन् वक्तृत्वाने सभा जिंकता;–
–सत्य अधोमुख मुकाट बसले !

० ० ०

पाप जगाचे अवघे लादुन
क्रूसावर तो येशु लटकला;
अन् पुण्य जगाचे अवघे–हडपुन
राजपदी कुणी विष्णु पहुडला !

पाप-पुण्य मी-अखिल जगाचे
माथी लेवुन भटके वणवण; !
-कुठे न जागा विसावण्या मज-
-नच सिंहासन-नच शूलासन !
-लाभो माझें मला शवासन !

० ० ०

वैराग्याही विटलो पुरता;
उरे न पापांचे आकर्षण !
संघर्षाची खाजही जिरली;
जिज्ञासेचे हो निर्मूलन !

उरले बाकी काय कळेना,
नुरले काही हेही वळेना !
सरता जीवन तरीं सरेना
-जगतो ? मरतो ?- नच उमजेना !

० ० ०

मी-पण माझे मला लाभुदे !
पुरेल मज ते सुखे जन्मभर;
-अन् पुरे जन्म मज एक एकला !

उसनवारिची-नको महत्ता !
-नको साधुता !
-नको लीनता !
अन् नको-नको- फुकी-वीरता !
-लखलाभ मला माझे मी-पण !
-करंट लक्षण !

कळो थोरवी मी-पणातली !
-क्षणभर माझी मला होऊ दे !
-अशी-जशी मी ; तशी राहु दे !

० ० ०

## संवाद

संवाद, –
माझा माझ्याशीच
माझा माझ्यासाठीच सतत अहोरात्र चाललेला
पण म्हणतात,
भिंतीला कान असतात !
–साऱ्याच भिंतींना
भिंतींना
कान असले, तर असूच देत !
–तेवढंच बरं !
–साक्षीला !
–अन् माझा संवाद–विसंवाद चालूच राहू दे

० ० ०

कुठुनसा आलो । पाण्या पावसांत,
भिजत चिंबत । गारठोनिया !
ठेच-ठेचाळता । अखेर लाभला;
आसरा रे मला । आभाळाचा !
आसरा रे मला; । –आढेच गळते,
–आभाळ फाटते । डोईबर !

कुठुनसा आलो । जळत–पळत,
उन्हाच्या वन्हीत । करपुनिया !
जळता पळता । अखेर लाभला,
आसरा रे मला । श्री छत्राचा !

आसरा रे मला । छत्रच जळते !
आभाळ पेटते । डोईवर !

० ० ०

–माझी धरती
तिच्या सुख–दुःखासह
मला हवी आहे !

–माझं सुख !
–कुणाच्या तरी आज्ञेवरून केलेल्या
पुण्य–कृत्यांचे फळ म्हणून,
–मला नको आहे !

अन् माझं दुःख
–कुणाच्या शापावरून केलेल्या
पाप–कृत्यांचे फळ
–मला नको आहे !

माझं सुख
माझं दुःख
–माझं मला,
–माझं मला,
मोकळेपणी मिळालेलं
हवं आहे !

माझी धरती,
तिच्या सुख-दुःखासह मला हवी आहे !

० ० ०

काटयांची भीति
कुणाला दाखविता ?
–मी तर फुलं वेचणारच आहे!
मधमाशांची भीति

कुणाला दाखविता ?
—मी तर मधु पिणारच आहे !

नरकाची भीती
कुणाला दाखविता ?
—मी तर सुख शोधणारच आहे!

मरणाचं भय
कुणाला दाखविता ?
—मी तर जगणारच आहे !

अन् भुतांची भीति
कुणाला दाखविता ?
—मी तर भुतांच्या मानगुटीला बसणारच
आहे!
अन् परमेश्वराच्या सुद्धा!

० ० ०

अंतर्यामींचे मम हितगुज
विश्रब्धपणे करण्या आज
—कवितेवाचुन कुणी न दुसरे—
छत्तिस वर्षांची ही बेरिज !

—वजाबाकी रे ! बेरिज कसली?
—अधिक उण्यांची नातो जमली !
—छेद जाऊनी परस्परांचा
—असंख्य, अगणित शून्ये उरली !

असंख्य, अगणित शून्ये उरली;
शून्यानी परि शून्ये गुणिली !
—धुडकावुनी अन् अवघी शास्त्रे,—
कितिक परार्धे अहा, बसविली !

० ० ०

कविता माझी निघाली सासरी !
पुसते डोळे नजर कुठे दुरी !
कविता माझी परतली माहेरी !
पुसते डोळे नजर कुठे परी !
कविता माझी सासरा-माहेरा,
-कुठेच का कधि तिज न आसरा ?

० ० ०

श्यामा रजनी रमली शशीसह !
-सूर्य जळतसे,-मत्सर दुःसह !
-स्वर्ण-शरांची कोटी कोटी
-रवी करीतसे निर्दय वृष्टी !
तन्वंगावर सुकुमारीच्या
बागा फुलल्या रक्त फुलांच्या !
कळी रवीची उमले रंगत !
-खळी शशीची अन् कोमेजत

० ० ०

# वय

माझं वय
मलाच ठाऊक नाही !
सारी वयं माझीच आहेत !
ज्याच्या जवळ
ज्यावेळी मी असेन,
त्याचं–तिचं वय
–तेच माझंही !
वय आपण होऊन,
खरं तर, थांबतही नाही,
–वहातही नाही
पण ते
कधी कधी
नको तेवढं थांबतं!
—हवं तेवढं 'मात्र' केव्हांच नाही!
अन् नको तेव्हां
कधी कधी
ते इतकं रेंगाळतं, अडखळतं,
—कीं चालतच नाहीसं वाटतं !
—पण तेच कधी कधी
इतकं झपाट्यानं
धावू लागतं,
उडू लागत,
झेपावू लागतं!

अन् कधी कधी
—एकदम कोसळूनहीं पडतं !
–असं हे वय !
–माझं – तुझं !
–अन् देवा!
तुझं–तुझं सुद्धा !

० ० ०

मज कवितेची नच हौस अती!
–बोलत मी --पण ती बोलविते !
अर्थ लाभ ना घरचे खाऊन
भाकर बडवित उपास काढून !

कीर्ती राहु दे! अपकीर्ति टळो!
–सहीं सलामत तरीही सुटलो !
धर्म–अर्थ–काम–मोक्षही–
–फिटली पुरतीं हौस सर्वही !

तरी न कविता पिच्छा सोडी,
छायेसम ती बिलगे वेडी !
उरांतुनी ती फुटुनी येते,
पहाडातुनी गंगा फुटते !

एकावरती एक उमाळे
स्फुंद स्फुंदुनी रडती डोळे !
अन् मी झालो तरि काय करू?
–तिचे उमाळे कसे आवरू ?

मज कवितेची नच हौस अती !
–बोलत मी ,-परि ती बोलविती!
'युद्ध' जुंपले महा–भयावह !
दुनिये संगें प्रत्येकासह !
–मला न आता स्नेही उरला,
—विवेक बुद्धी जागृत दुःसह !

'सख्य' जाहले पहा सुखावह,
दुनियेसंगें – प्रत्येका॑सह
—मला न आता शत्रू उरला!
–विवेक बुद्धी जागून दुःसह!
सख्य म्हणा वा घोर लढाई!
प्रत्येकासह–दुनियेसहही
शत्रु–मित्र मज कुणी न उरला!
सर्व हरपले तिच्याच पायी!

तीच एकली हृदय संगिनी!
तीच एकली अदय वैरिणी!
तिजविण मजला नसे आसरा!
—तार, मार गे मला डाकिणी!

० ० ०

मनांतल्या मनांत,
तळातल्या हो तळांत!
कितीक गुपिते इवली इवली!
खोल खोल-किती खोल लपविली

गुह्य–गुह्यतम त्या गुह्यांतिल
खोल खोल अन् त्या खोलीतिल!
कदा प्रकटले अहो अचानक
कसे कुठे ते मजही न ठाऊक!

दुर्दैवा! तुज काय हवे रे?
स्वप्नींहि तव का पाठलाग रे?
–जाऊ पळुनी स्वप्नांमधुनी–
कुठे? कसा? अन् लपून बसु रे?

जागृतीतुनी स्वप्नी पळतो!
स्वप्नातुन पळ पुन्हा काढतो!
स्वप्न जागृती वैरी दोन्ही–
–नेणीवेचा ठाव शोधितो!

० ० ०

## ‘ प्रत्यंचा ’

प्रत्यंचेसम जीवन माझे–
दोरी तर तुटता–तुटत नाही !
बाण तर सुटता–सुटत नाही,
–अन् प्रत्यंचेचा ताण तटतच रहातो !
तटतटतच रहातो !
–पण मंत्र मात्र
आठवता–आठवत नाहीत !
–लक्षावरून ढळत–ढळता नाही !
दोरी तुटो न तुटो!
बाण सुटो न सुटो!
पण बोटे माझी
धनुष्यावरून, दोरीवरून
कधीही न निसटोत !

० ० ०

## कुंती-दुर्वास

कुंतीला मिळाले वर-दान,
-तिने न मागितलेले!
-तिला मिळाले तेव्हा तरी न सुचणारे वर!
त्या अजाण अश्राप किशोरीला
मिळालेले ते वर
-न मागताच !

पण कोपिष्ट दुर्वासाने
असले ,
न मागितलेले वर
त्या अश्राप पोरीला
दिले तरी कसे ?
आणि कां ? कां ?

दुर्वासाला
तिच्यामध्ये असं काय गवसलं ?
-की, त्याने असले
-मुलखा वेगळे
कुंतीच्या वयावेगळे
वर तिला दिले ?
तिने त्या कोपिष्ट - छांदिष्ट
तापसाला,
— तामसाला

संतुष्ट तरी कसं केलं असेल ?
—कोणत्या सेवेनं ?

दुर्वासाने अजूनपर्यंत
कधीही
कुणालाही
कसलाही
वर दिल्याचं ऐकिवात नव्हतं !
पण तो तामस—तापस
कधी नव्हे तो प्रथमच
प्रसन्न झाला होता !
आणि त्याने वर दिला होता !
—एका अजाण—अनाघ्रात
किशोरीला !

–पण त्या वरदानामुळे
ती किशोरी चाळवली !
—बावचळली?
–की निसर्ग नेमका
त्या क्षणी
तिच्यावर भाळला?

–पण तिने वराची प्रचीती बघण्यासाठी.
साक्षात् सूर्यनारायणाचीच साक्ष काढली !
—अन् सूर्यनारायणही
इतका कर्तव्य–तप्तर !
तो पडत्या पुण्याची आज्ञा घेऊन
तत्काळ प्रकट झाला !
अन् एका अजाण अनाघ्रात पुष्पवतीची
जिज्ञासा त्याने तत्काळ तृप्त केली !

कुंतीने त्या परमज्ञानाचे फळ
प्रथमच चाखले !
नंतर त्या ज्ञातास्वादेला
आयमची चुटपूट
–चटक
लागून राहिली !
अन् तिच्या त्या कुमारी–सुलभ
जिज्ञासेचे चटके
नंतर ती जन्मभर भोगत राहिली!

–की
बिचारी कुंती
–बिच्चारी नव्हती?
–इतकी अजाण अश्रापही नव्हती!
तिने दुर्वासाला प्रसन्न कसं केलं असेल?
–अशी सेवा की,
कशानेही–कधीहीं
संतुष्ट न होणारा तो तापस–तो तामस
इतका प्रसन्न–इतका संतुष्ट झाला
–जन्मात प्रथमच !
कुंतीची सेवा
अन् दुर्वासाची तृप्ती–संतुष्टी;
त्यामुळें दुर्वासाने दिलेला वर;
–अन कुंतीने केलेला त्यांचा वापर !
सारेच काही अनोखे –अनाकलनीय !

दुर्वासाने आजवर दिलेल्या
सर्वं शापांपेक्षाही भयानक
असं हे वरदान ठरलं !

–निदान कुंतीला तरी.
–अन् कर्णासकट सर्व कौन्तेयांना;
–माद्रेयांना
–पांडवांना
–कौरवांना
पांडव–कौरवांच्या अठरा अक्षौहिणी सेन
दलांना सुध्दा,
त्या वरदानाचे चटके
कुंतीच्या पुत्र पौत्रांना–प्रपौत्रांना–
–आम्हा साऱ्या भारतीयांना
अजूनही भोगावे लागतातच आहेत !
–व्यासोच्छिष्ट भारतीला भारताला !
. . .

# स्त्री

संसारात
स्त्री
-कशी भरून रहायला हवी;
-सदा-सर्वदा-सर्वत्र !

तिच्या रातराणी सारख्या गंधाने,
-वीणेसारख्या वाणीने,
रंगाने-रूपाने
भासाने-ध्यासाने.
-तिच्या अवघ्या अस्तित्वाने
संसाराचा सारा आसमंत-
कसा नुसता भरून-भारून जायला हवा !
-परमेश्वरासारखा !
-फरक एवढाच की,
परमेश्वर नसतो !
(निदान नसणाऱ्याला तरी नसतो ! )
-अन् स्त्री असते !
असणाऱ्याला तर असतेच;
-पण नसणाऱ्यानाही ती असतेच !
-अधिकच !

० ० ०

# कुंती–माद्री

सवती-सवती
माद्री–कुंती
–एका मरतुकडया लंपटाच्या दोन राण्या !
एक आवडती?
एक नावडती?
दोघीही दुरूनच!
एका मदन लंपटाच्या दोन राण्या !
पण तरीही
कुंतीचं खरं जीवन–दुःख,
म्हणजे माद्रीचं क्षणिक मरण–सुख !
–एवढंच होतं.
माद्रीच्या सुख–मरणामुळे
कुंतीचं दुःख–जीवन
अधिकच भयाण–वैराण–असह्य झाल
अन् माद्रीच्या सहगमनामुळ
कुंतीच दुःख चिरंजीव झालं !
–अश्वत्थाम्याच्या मस्तकावरील तेजस्वी
मण्याच्या
सतत ठणकणाऱ्या–वाहणाऱ्या
चिरंजीव व्रणाप्रमाणं–!
माद्री मेली
मरतुकडया पंडूच्या मरण–मिठीमध्ये
पंडू अन माद्री–दोघेही गेले;
मदन–मोहित मरण–मैथुना मध्ये !

कुंती राहिली मागे,
तिच्या पंचपुत्रांची डागळलेली फळं
सांभाळीत
—जळत-विव्हळत राहिली जन्मभर
अन् मग मागत राहिली-वेदनेचं वरदान !
—भगवान—श्रीकृष्णाकडे !
कुंतीचे (आमंत्रित) पाच प्रियकर
गेले क्षणभर मजा मारून !
तिच्या उदरी—पापांची फळं बांधून !
कुंतीनं जन्म दिला
वाढविलं—पाच पुत्रांना
पाच दुःखांना !
कुंतीच्या दुःखाचा

वारसा चालविला
पुण्यशील पांडवांनी
पंडु—पुत्रांनी—पौत्रांनी
आणि आजही चालवीत आहोत
आम्ही तो वारसा !
—पापाची मोहिनी पडण्याचा !
पापांची जबाबदारी टाळण्याचा !
वारसा !

अन् वर
वेदनेचे वरदान
भगवंताकडे मागण्याचा
कुंतीचा वारसा !
—तो आम्ही आजही चालवीत आहोत !

◦ ◦ ◦

# कुंती-गांधारी

कुंतीला होती
सूर्याची लाज !
–पण होती
तितकीच त्याची ओढ !
–क्षणभर भोगलेल्या
अजाण
अश्राप
–उन्मादाची !

० ० ०

अन् गांधारीला होता वर्ज्य
तोच सूर्यदेव !
–पातिव्रत्याच्या
वृथा व्रतासाठी !
तिने डोळे बांधले होते;
–पण
ते मिटले मात्र नव्हते !
–मिटतील कसे ?
–कसे मिटतील असे ?
तिनेही कौमार्यात
पाहिले होते सूर्याचे तेज !
तेव्हा प्यायली होती ती
–आकंठ
–अथांग
प्रकाशाचं तेज !

० ० ०

दोघींच्याही दुःखाचं मूळ
-सूर्य ! सूर्यप्रकाश !

दोघींनीही केले वैर
-सूर्याशी - तेजाशी !
एकीनं-लाजेपोटी !
दुसरीनं-व्रतापोटी !
-दोघीही वागल्या खोटया !
-अन् ठरल्या करंटया !
[ अन् खरं तर वांझोटया ! ]

० ० ०

त्यांनी भोगली होती नुसती
-कठोर शिक्षा !
-व्रताची
-(पतिव्रताची-पत्नीव्रताची ! )

शिक्षा-
स्वतःच स्वतःला केलेली !
स्वतःला-
आणि
-आपल्या पुत्र पौत्रांना
-आप्तस्वकीयांना

पिढयान् पिढयाना
-भोवलेली
-कठोर शिक्षा !

० ० ०

कुंतीचा डोळस–लज्जित अंधार !
गांधारीचा व्रतस्थ तामसी अंधार !
अजूनही पाठलाग करतोच आहे
        –प्रकाशाचा
        –अन् आमचा
        –आमच्या भवितव्याचा
–एवढं सारं महाभारत घडून गेलं तरीही !
        अन् व्यासानं सारं जग
उष्टावून (नासून) टाकल्यानंतरही !

० ० ०

कुंती अन् गांधारी
दोघीही फसलेल्या
–फसविलेल्या कुमारिका !

        अजाण–
        अश्राप–
एकीला फसवलं–
                तिच्या कौमार्यानं !
        –मदनाच्या पहिल्या चाहुलीनं
        अजाण, अश्राप जिज्ञासेनं !
पण ती सावरली !
        –की अधिकच घसरली ?
        फसली–कायमचीच रुतली !
अन् उन्माद ?
        तो तर केव्हाच ओसरून गेला होता!
अन् मग तिचा जन्म गेला

कोण्या एका
कामविव्हल नपुंसकाचा
पातिव्रत्यधर्म पाळण्यात !
-त्याच्या लाघट लोचट लंपट
मत्सरी षंढ-पुरुषार्थात !

० ० ०

दुसरीचीही झाली
तशीच फसगत !
-गांधारीची.

तिची केली प्रतारणा-वंचना,
प्रत्यक्ष पित्याने-बंधूने
-अन् भीष्माच्या प्रतिज्ञेने!
अन् ज्ञानी विदुराच्या महात्म्याने,
-अगतिक सात्विकतेने,
गांधारीच्या विवाहाचा
झाला सौदा !
तच्या अश्राप-अजाण कौमार्याचा
झाला सौदा !
सौदा केला
धर्माच्या नीतीच्या
अधिकृत ठेकेदार भडव्यांनी !
गांधारीने सावरण्याचा प्रयत्न केला;
-एका कठोर मूर्ख हट्टी व्रताने-
-अंधव्रताने !

० ० ०

दोघीही फसल्या
कुंती नि गांधारी !
गांधारी नि कुंती !

अन् दोघीही झाल्या
वैरिणी-एकमेकींच्या !

दोघी प्रसवल्या वैराला
--एकमेकींच्या !

कुंती अन् गांधारी
गांधारी अन् कुंती !
अन् दोघीही अखेर शांत झाल्या
— वणव्यात !

धडधडत्या सर्वभक्षक-
० ० ० सर्वतक्षक वणव्यात !
जन्मभर जळणाऱ्या त्या दोघीही
--अखेर विझल्या वणव्यात !
यौवनाचा अग्नी विझून कोळ झाल्यानंतर !
वार्धक्याच्या सरणात !
धृतराष्ट्रासंगे -- विदुरासंगे
विझल्या – विझल्या !

त्या दोघी –
कुंती अन् गांधारी
गांधारी – अन् कुंती !

० ० ०

## यादवी

यादवी-

तीही झाली

भगवान् श्रीकृष्णांच्या

द्वारिकेतच !

त्याच्याच राज्यात, त्याच्याच यादव कुळांत!

त्याच्याच डोळ्यादेखत

-त्याच्याच देखरेखीखाली

-म्हणाना हवं तर !

• • •

ती सुरू झाली;-

गम्मत म्हणून,

जम्मत म्हणून,

चेष्टा म्हणून,

मस्करी म्हणून-सुरू झाली,

-अगदी निर्हेतुक

-अगदी निष्काम कर्मयोग

म्हणून म्हणा हवं तर !

• • •

-आणि कर्मफल ? निर्हेतुक निष्काम-

कुलक्षय !

-पण कुलस्त्रिया तेवढ्या वाचल्या !

-पुढे दस्यूंनी

पळविण्यासाठी !

-फळविण्यासाठी !

• • •

–आणि आधी धर्मक्षेत्रे-कुरुक्षेत्रे !
घडून गेलेली, यादवीसारखीच,
–कौरवी, की पहिली पांडवी!

धर्माच्या नावानं ?
कर्माच्या नावानं ?
निष्काम कर्मयोगाच्या नावानं!

साक्षात् भगवान् श्रीकृष्णाच्या
गुरुपदेशानुसार !
–गीतोपनिषदानुसार
घडून आलेली–
कौरवी-पांडवी !
प्रत्यक्ष शस्त्र करी न धरता–
श्रीकृष्णाने सांगितलेल्या चार युक्तीच्या
गोष्टी बरहुकूम–
माजलेली कौरव-पांडवी !
ही आधीची-धर्म-क्षेत्रातील
कुरु-क्षेत्रातील

## कौरवी-पांडवी

–नंतरच्या
द्वारिकेतील यादवीची नांदी !

–पण यादवांसाठी श्रीकृष्णाने
नव्याने गीता मात्र का सांगितली (नाही)

० ० ०

# जिवंत समाधी !

जिवंत समाधी !
    –सीतेची;

° ° °

सती सीतेचीही जिवंत समाधी,
    – संत ज्ञानेश्वरांसारखीच !

° ° °

– पण किती वेगळी ?
पदरी दगड बांधून डोहांत उडी घ्यावी,
        – तशी त्या सतीनें
        – धरतीच्या विवरांत
        – जणू मातेच्या उदरांत
        –उडी घेतली !

° ° °

आणि ज्ञानेश्वर !
    वारकऱ्यांच्या,–टाळकऱ्यांच्या
        गजरात
    गुरु निवृत्तीचा हात धरून,
ज्ञानेश्वर विवराच्या पायऱ्या उतरून
आत गेले;
    अन् सजवलेल्या आसनावर
    आसन घालून
ते समाधिस्त झाले!
–नंतर निवृत्तीनाथांनी विवराच्या तोंडावर
            शिळा बसविली ?

° ° °

अन् सीतेची समाधी ?
तिला कोणी समाधीही म्हणत नाही!

–म्हणतात,–
सीता भूमीच्या उदरांतच गडप झाली

–आणि म्हणतात
श्रीज्ञानेश्वर समाधिस्थ झाले !

० ० ०

श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीमधून
अजानवृक्ष उगवला
भूमीमधील आणि अंतरिक्षामधील
सहस्त्र–सहस्त्र अंकुरानी
तो अक्षय वृक्ष
सतत बहरतच गेला
–अजूनही तो
बहरतच आहे,

वारकऱ्यांच्या–टाळकऱ्यांच्या–माळकऱ्यांच्या
भजनाच्या
कल्लोळामध्ये !

० ० ०

–पण सती सीतेची समाधी ?
–ती आहे तरी कुठे ?
दयाघन वाल्मीकि मुनींनी
एवढे रामायण सांगितले;

–पण त्यांत सीता कुठे होती ?
–ती कुणाची कोण होती ?
–तिचं पुढं काय झालं ?
–ती कुठे गेली ?
त्या सतीचं वृंदावन कुठे आहे ?

० ० ०

त्या सतीचं वृंदावन
कुणी कुठं बांधलं असेल,–
तर त्यावर–
माझ्या आसवांची फुलं
मला एकदा तरी ढाळू द्या !

× × ×

# स्त्री-पुरुष

स्त्री अन् पुरुष,
एकमेकांना किती किती परींनी,
सुख देऊ शकतात !
-केव्हा-केव्हा ?
कुठे-कुठे ?
-किती-किती परींनी-तऱ्हांनी !

एकमेकांना सुख देऊ शकतात-
स्त्री अन् पुरुष !

० ० ०

-आणि
स्त्री अन् पुरुष-
किती किती परीनी-
-किती किती पटींनी;
दुःखही देऊ शकतात ?
एकमेकांना-
कुठे कुठे ?
केव्हा केव्हा !
किती किती परीनी - पटींनी, दुःख देऊ शकतात !
स्त्री अन् पुरुष - एकमेकाना !

× × ×

## ‘ओलेती’

ओलेती होत नाही,
    नुसत्या ओल्या वस्त्रांनी !
ओलेती होते,
    ओल्या गात्रांनी !

० ० ०

ओलेती होते,
    ओल्या पान्ह्याने
–ओल्या पान्ह्याने
    –पुष्पवतीच्या
    –गंधवतीच्या–
ओल्या पान्ह्याने.
    पुत्रवतीच्या–
    –ओल्या पान्ह्याने होते ओलेती!

० ० ०

अन् ओलेती होते;
    –सुक्या पान्ह्याने सुद्धा !
सुक्या पान्ह्याने–
    लिंगवतीच्या–!
    अंगवतीच्या !

× × ×

• ० •

काळया काळया, खोल खोलशा
तुडुंब डोळयांच्या डोहातुन;

तुवा टाकिलीं एक नजवरी
सहज अभावित चुळकी कोठुन?
—तेव्हापासुन सदा मिरवतो
कलंक,—तिलकापरी भाळावर!

• ० ०

तिचिया पदराला
फुटली आसवे
— माझीया डोळयांच्या
कडा या कोरडया !
गर्व हा माझा—
धन्य धन्य !

० ० •

तुडुंब भरले तृप्त सरोवर
प्रशांत, प्रसन्न, नितळ मनोहर.
जातां—येतां काठावरुनी
हळुच अकारण खडे मारुनी,
— ढवळिशी का तूं उगा सरोवर ?
— चाळविशी का गे उगाच अंतर ?

× × ×

० ० ०

देतेस–

हवं तेव्हा; हवं तेवढं !

–पण एकदाही घेत नाहीस !

–ही काय रीत झाली ?

देणारी देते;

घेणारा घेतो,

परिणाम एकच !

घेणाराला जे मिळतं,

तेच देणारीलाही

काही एक कमी नाही,

काही एक जास्ती नाही;

–मग तिने दिलं,

त्याने घेतलं;

–ही देण्या-घेण्याची भाषा कशाला ?

० ० ०

देणारीचं काही जात नाही;

घेणाराला मात्र मिळतंय सगळंच !

घेणारा घेतो;

पण घेता घेता सर्व काही देतोही !

–हेही वेड्याला समजत नाही !

दोघांनाही मिळतं एकच;

सारखंच;

भरपूर–पुरेपूर !

मुक्त !

× × ×

## कोकिळा !

पलीकडच्या स्वैपाक घरातून
ती वेडावते आहे;
-कोकिळेला !

• • •

ती तऱ्हे-तऱ्हेचे
आवाज काढते आहे;
-तिच्या मते-कोकिळेसारखे !
वेगवेगळे आवाज,
वेगवेगळ्या सुरांत,
-सप्तकाच्या साती सुरांत,
-काढते आहे ती !
-पलीकडच्या स्वैपाकघरांतून !
कोकिळेला वेडावण्यासाठी !

• • •

दोन कोकिळांचा हा खेळ
चालला आहे केव्हापासून !
त्या दोघींचा
संवाद चालला आहे
-सुसंवाद
-सुखसंवाद;
वेडी वेडावते आहे;
-एक वेडी दुसऱ्या वेडीला !
किती सुस्वर,
सुंदर
किती सुमधुर !

• • •

अन् इकडे,
या खोलीत,
मी वेडा ऐकत बसलो आहे;
—गुपचुप
चुपचाप—चोरून !

• • •

चोरूनच ऐकायला हवा,
हा संवाद,
सुख—संवाद,
त्या दोघींचा

• • •

दोघीही माझ्याच आहेत ना ?
—माझ्यातल्याच
—माझ्या बागेतल्याच

• • •

वेड्यांनो !
खुशाल वेडावा—
एकमेकींला.

मी वेडा ऐकत बसलोच आहे,
— चोरून—चुपचाप.

मी तुम्हाला वेडावणार नाहीं,
— या वेडाचा भंग न होवो कधीही.

× × ×

# रोज पहाटे

रोज पहाटे झोप मोडता,
तुझी आठवण पहिली यावी,
बकुल-फुलांच्या मधु-गंधासम
प्रीती अवघी भरुनी जावी !

० ० ०

घरट्यामधली नाजुक कुजबुज
गळ्या-गळ्यातच गीत घुमावे;
खुळें जोडपे मज वेडावत,
—मनी पाखरा पंख फुटावे !

० ० ०

सकाळ होता किरण कोवळे
गोड गारव्यावर बिलगावे;
आठवणींच्या तुझ्या उबेने
धुके मनातील अन् वितळावे !

० ० ०

चढणीवरती दुपार दुःसह
खडखड कशितरी ओढित न्यावी;

शांत गारशी झुळुक कुठुनशी
अवचित मधुनच वहात यावी !

० ० ०

संध्या–छाया लांब–लांबता–
दिशा चहुकडे अंधाराव्या;
उदास हुरहुर अबोध कसली ?
–जीव–भावना व्याकुळ व्हाव्या !

• • •

एकाकी मम शय्येवरती
शिणली काया आणि पडावी;
–आणि प्रीतिची शाल मखमली
हळुवार करे कुणि घालावी !

• • •

## सदाफुली

हे कोणतं फूल ?
 – ज्याच्या देठावर
 सतत
 कळी फुलतच असते !

एक कळी खुडली,
 तर तिच्याखाली
 दुसरी–तिच्याखाली–
 तिसरी–चौथी
 शंभरावी–हजारावी !
–कळी सदा हसतच असते !

० ० ०

प्रत्येक कळी
 सारखीच ताजी,
 नवी
 टवटवीत
 गेंददार, भरदार, सुडौल, सुगंधी !

–सदाफुलीची कळी ओठांवर !
–सदाफुलींची खळी गालावर !

× × ×

० ० ०

पहिलं तान्हुलं जन्माला येतं;
अन् जन्मताच
ते जन्म देतं–!
–आपल्याच आई–बापांना !
–आई हजर असते, प्रत्यक्ष जन्मक्षणीं;
–बाप जरी कधी कधी बेपत्ता असला तरीही!

० ० ०

सकाळी उठोनी,
प्रथम तू दिसावे !
–गोड अन् हसावे !
अन् हसणे ते उरावे
दिनभर !

गोड गोड हसू
रहावे दिनभर !
मनोमन भरून । ओसंडावे

० ० ०

तुझ्याकडे आलो सखे,
भरतीच्या पावलानी,
–हंसत नि खळाळत,
नाचत, कोटी लाटानी !
–आणि आता जाणे आले,
हाय माघारी फिरुनी !
स्फुंदत, अडखळत,
ओहटीच्या पावलानी!

० ० ०

स्वप्नात यावया का
-लागे तुझी अनुज्ञा ?

-येऊ तशीच का मी ?
- करुनी तुझी अवज्ञा ?

० ० ०

माझे मला न ठावे,
-कशि मी दिसेन तुजला ?

येते हवी तशी मी;
बघ रे खुशाल मजला !

० ० ०

तुझिया मनी कशी मी,
ठसली असेन जैशी;

(सत्यात ना तरीही)-
-स्वप्नी दिसेन तैशी !

स्वप्नात यावया का ?
-लागे तुझी अनुज्ञा ?

-येऊ तशीच का मी
-करूनी तुझी अवज्ञा ?

० ० ०

० ० ०

आगलेपणीं तुझ्या नि माझ्या
अशी दुरावा कां करतेस ?
जन्मांतरिची दावेदारिण-
-वैर इतुके कां धरतेस ?
-अन् झालेच जणु काही न कधीही-
अशी अभावित स्वप्नी येऊन;
-स्वप्नांतरिही जे न चिंतिले,
खुशाल सगळे जाशी देऊन !

० ० ०

रविराया रे प्रकाश दे
पुनवेच्या चंद्रावाणी
युधी गेला खेळायाला
उन्हामध्ये अनवाणी !
मोटारवाल्या, मोटार कोरी
हळू जराशी हाक;
बाळ माझं रस्त्यामध्यें
खेळतं रे त्या सांभाळ !

० ० ०

आभाळाच्या घंगाळात बाळ माझं बसे न्हाया;
गंगामाईला खळ नाहीं,कोटी तारा ओवाळाया
आभाळाच्या घंगाळात न्हाया बसे ध्रुवबाळ
इवल्या हाती पाणी उडे, तारकाना चंद्रबळ!
ध्रुवबाळ न्हाया बसे, झारी आकाश-गंगेची;

माऊलीच्या मायेपरी, धारावृष्टी तारकांची !
ध्रुवबाळ न्हाया बसे, आकाश-गंगेच्या तीरीं,
अरुंधतीला फुटे पान्हा, सात ऋषींच्या संसारीं

० ० ०

तुझिया हातची

अक्षरे वाकुडी
बोलकी बोबडी;
–दिसो केव्हां ?

तुझिया तळव्यांची

मऊ दुलदुली,
बोटांची इवली
–मिठी पडो !
–बाळा मिठी पडो !

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६०
२३५९८
दा. क्र.
काव्य पाताळे
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

० ० ०

डोकावुनिया प्रथम पाहिले
सरोवरामधि जैं चंद्राने;
घात-क्षण नर अखंड शापी
-दर्पण वरिला तें रमणीने !
पुरुषाचा बघ प्रतिस्पर्धी तो !
सदा-सदांचा एक-एकला !
अबोल, अरूप, निश्चल, निर्जिव-
-दर्पण सोडी न क्षण रमणीला !

० ० ०

हळुच टाक गे मंद पावले;
मंद श्वासही रोख कोमले
जायचे तरी खुशाल जाई,
-तुला कशाची सदाच घाई !
चाळवू नको स्वप्न रंगले;
-हळुच टाक गे मंद पावले !

० ० ०

## चाहूल

ती सुखाची चाहूल !
अवचित, अनाहूत–अकारण !
कोठून ? कशामुळे ?

भ्यायलीस ?

सुखाच्या केवळ झुळुकेसरशीं ?
–कुठूनशी फुटलीय ही झुळझुळ ?
–कुठं जाणार आहे ही वहात ?
–कुठं नेणार आहे मलाही वहावत ?

० ० ०

–सोसेल ?
मला हे सगळे ?
हे सगळे सुख–सोहळे ?

की बरा आहे
–तो दुःखाचाच वास ?
आपला नेहमीचाच–ओळखीचाच ?

कशाला हवीय आपल्याला
–नसत्या कुंकवाची उठाठेव-?
कधी न जायच्या गावाची वाट ?

० ० ०

की येऊ दे ?

मागील दारानं ?

—यारासारखं ?

—की तमाशातल्या सारखं ?

की खुशाल

पुढच्या दारानं ?

वाजत वाजत

—नवऱ्यासारखं ?

० ● ०

कसंही—अगदी न आलं तरी चालेल मला !

मी आपली चाललेच आहे ना ?

कधीपासून ?

कुठूनशी ?

कुणीकडे ?

मला चालाय्‌लाच हवंय ! —एकटंच !

जमलंच तर दुकटं-सुद्धा

—तिकटंही चालेल !

नाहीतर आहेच ; —

मेलीचं नशीब ! —नकटं !

×××

सुरी उरीं म्यां सदा वाहिली !

रुधिर-धार अन्‌ वाहु ना दिली !

—नयनिं आसवे सतत जिरविली ;

—असह्य कळ तशी—तशीच साहिली !

—अन्‌ अखेरच्या आज या क्षणी

कशास काढू सुरी उपसुनी ?

० ● ०

## तुला पुन्हा भेटायला येताना–

तुला
  पुन्हा भेटायला
    आज येताना,
  –धडधडतो का हा ऊर ?
  –मनांत ही का नसती हुरहुर ?

• • •

तुला
  पुन्हा भेटायला येताना,
  अजून कोठली ही उत्कंठा ?
  –कोठली ही उत्कटता ?
–तुला भेटायला पुन्हा येताना–!

• • •

–जणू काही,
  –पूर्वी कधी भेटलोच नाही !
  –एक–एक–एक होऊन कधी
    गेलोच नाही ?
–जणू काही,
  कधी जळलो–जुळलोच नाही ?
  –कधी भांडलों–तंडलोच नाही ?

• • •

–जणु, सुखशय्येवर काटे कधी बोचलेच
नाहीत ?

अन् सतीसारखे चितेवर जणुं कधी जळलोच
नाही ?

–जणु कधी आपण भांडून,
एकमेकापासून, दूर गेलोच नाही ?

अन् लोचटासारखे,
लंपटासारखे पुन्हा-पुन्हा
जवळ कधी आलोच नाही ?

० ० ०

–जणु सुखाचा भरलेला घडा,
आपण कधी फोडलाच नाही ?

–जणु जमलेली घडी
आपण कधी विस्कटलीच नाही ?

–जणु भरलेल्या ताटावरून
आपण कधी उपाशी उठलोच नाही ?

–अन् भरलेल्या संसारात कधी
विटक्या अनासक्तीचा

विटका संसार आपण कधी थाटलाच नाही

० ० ०

–जणु
–भरल्या कोर्टात
व्यभिचारांचे आरोप-प्रत्यारोप
आपण कधी केलेच नाहीत ?
अन् बदनामी कधी सहन केलीच नाही ?

० ० ०

–पण एवढं सारं घडल्यानंतर
एवढं सारं सोसून झाल्यानंतरही
आज तुला
पुन्हा भेटायला येताना–

धडधडतो हा का ऊर ?
–मनांत का ही नसती हुरहुर ?

–जी पहिल्या भेटीच्या वेळीसुद्धा इतकी
नव्हती ?
अन् पहिल्या रात्रीच्या वेळी,
–तर नव्हतीच नव्हती !

× × ×

० ० ०

तिला–
–जिने
माझ्या कवितेचा हरवलेला सूर,
मला परत मिळवून दिला !

० ० ०

–पण केवढी जीवघेणी
किंमत वसूल करून

० ० ०

–पण म्हणून काय झालं ?
कवितेची किंमत मोजावीच लागते !
–रोख सुख–दुःखामध्ये !

० ० ०

## वांझ !

जीवनांत
काहीच वांझ नसतं;
–मरणांतही नसतं,
काही एक वांझ !

० ० ०

वांझेला प्रियकर तर असतोच;
वांझेला वेदनाही असतात,
–अगदी प्रसव–वेदनासुद्धा !

तीही जन्म देते;
तिच्या बाळांना !
–पण जी बाळं.
आपल्या ओळखीची नसतात ?

बाळं !
–तिची तीच ओळखते;
तिला पान्हाही फुटतो;
तिच्या तान्ह्यासाठी !
–तिच्याच कान्ह्यासाठी !

× × ×

## सप्त–पदी

सात पावलें !
    सप्त–पदीची
    सात पावले सोन्याची !

—त्या पावलावरून टाकलेली
    सात इवली पावले फुलांची !

० ० ०

    सोन्याचा वर्ख
    उडून जातो;

—अन् फुलांचं निर्माल्य होतं !

० ० ०

अन् सप्तपदीची अखेरची पावलं ?
    —मातीची
    —राखेची ! —सतीची !

—सात पावले, सतीची !

० ० ०

० ० ०

–मी फूल नाही !
मला फुलासारखं
झेलू नकोस !

० ० ०

–मी देवता नाही
माझी देवतेसारखी
पूजा बांधू नकोस !

० ० ०

–अन् मी रांडही नाही;
–मला रांडेसारखी
गुधडू नकोस !

० ० ०

मी स्त्री आहे.
मी माणूस आहे;
–मला माणसासारखी वागव;
–एवढच-एवढंच माझं मागणं ?

० ० ०

० ० ०

चितेवरली सती,
-जळते एकदाच !
सहस्त्र ज्वाळानी
मृत-पती समवेत !

-पण
शय्येवरली सती
जळते रोजच !
रोज रात्रभर,
जन्मभर
पतीबरोबर !

० ० ०

-ती जळते
जन्मोजन्मी
-एकाच पतीच्या
शर-शय्येवर

० ० ०

तिची
चिता जळते सहस्त्र ज्वाळांनी !
-पतिव्रतेची
शय्याही जळते
तशीच, तशीच सहस्त्र ज्वाळानी
अन् दोन्ही हसतात
सहस्त्र फणानी !
-सहस्त्र जिव्हानी !
-आपल्याच
सतीत्वाला
-पातिव्रत्याला !

× × ×

## नजर !

तो माझ्याकडे
वाईट नजरेने बघतो !
-तक्रार करते;
एक पतिव्रता;
आपल्याच पतीबाबत !

० ० ०

उलट
एक बिन-नवरा,
एका बिन-बायकोकडे-
किती सुंदर, पवित्र, प्रीतीपूर्ण
नजरेने बघतो,
-असे धन्य-धन्यतेचे उद्‌गार काढते,
एक जीवाभावाची मैत्रीण !

० ० ०

नजर खरी, नातं नंतरचं !
नजर बरी-वाईट,
जशी असेल तशी
नातं नंतरचं, खरं-खोटं
प्रासंगिक-अनुषंगिक

सौन्दर्य, पावित्र्य, प्रेम–
सगळं असतं नजरे मध्ये
नात्यामध्ये नव्हे.
नजर निकोप असेल,
तर स्त्री–पुरुषांमधलं
कोणतंही नातं
सदाच किती सुंदर, पवित्र
प्रेममय असतं !

× × ×

वेश्येलाही पाळावा लागतो,
–वेश्याधर्म !
–पुरुषाचा देहधर्म
–आपद्धर्म
निभावून नेण्यासाठी !
–पतिव्रतेचा सतीधर्म
सिद्धीस जावा
एतदर्थ !

० ० ०

वेश्येलाही पाळावा लागतो
–वेश्याधर्म !
सतीधर्माप्रमाणेच
–देहभराने
–हसतमुखाने
–सर्वस्वाने
शर–शय्येवर
सती सारखाच !

× × ×

×

स्वप्नात मात्र
कशी येतेस ?
—सरळ सुतासारखी !

नाहीतर नेहमीचीं ती खळखळ,
आदळ, आपट
रुसवे फुगवे; अन् काय काय ?

स्वप्नांत मात्र
कशी येतेस
सरळ सुतासारखी !

× × ×

तिचा नवरा
म्हणजे अवघड जागचं दुखणं !
कुणाजवळ बोलण्याचीही सोय नाही !
—त्यावर उपाय-उपचार काही नाही !
निमुटपणे नुसतं सोसायचं !
(डोळयांतून पाणी काढण्याचीसुद्धा चोरी !)

तिचा नवरा—
म्हणजे अवघड जागचं दुखणं !

× × ×

## ऋतु-चक्र

गुंतण्यासाठी खटपट,
–अन् नंतर – तुटण्यासाठी !
    –गुंतलेली विव्हळते,
    –न गुंतलेले भुंकतात !

–अन् मधून मधून
    गुंतलेल्यांवर तुटून पडतात !
    –त्वेषाने,
    –द्वेषाने,
    –निर्दयतेने,
    तुटून पडतात – गुंतण्यासाठीच !

° ° °

असे हे सोहाळे चालू असतात !
असं हे चालू होतं

    विव्हळणारीच
        गंधवतीचं
        ऋतुमतीचं
            ऋतु-चक्र !
    –तिच्या ऋतुशांतीचं !

° ° °

×

गुंतणारे गुंतलेले असतात;
त्यांची गुरफट
फरफट
चालू असते,-
-असहाय्यतेने !

ते सहसा, सुखासुखी
सुटत नाहीत;
तृप्त होऊन,
शांत होऊन ते सुटत नाहीत

-ते तोडले जातात !
-भुंकणाऱ्यांकडून
तोडणाऱ्यांकडून !

-अखेर तोडणें हीच दया !
[पण ही दया क्षणाचीच !
-निदान गंधवतीला तरी!]

तुटणारा तुटतो,
केकाटत दूर होतो,
-चाटत बसतो जखमा सुखाच्या !
पण तुटलेली ?
ती केकाटत तुटलेली,
पुन्हा पुन्हा गुंतली जाते,
गुंतविली जाते,
चार आशाळभूत, क्रूर, आधाशी नरांशी !
-चारांपैकी एकाशी !

० ० ०

×

असा हा चालतो,
तिचा ऋतुशांतीचा सोहाळा !
–एकाशी
–दुसऱ्याशी
–तिसऱ्याशी
–चवथ्याशी
किती – कितिकांशी !
–गंधवतीचा गंध
हुंगून,
ओरबाडून संपेपर्यंत !

० ० ०

पण मग,–
मग कसं शांत-शांत !
तृप्त शांत !
तृप्त–तुडुंब–शांत !
तुडुंब-तृप्त-कृतकृत्य-कृतार्थ!

० ० ०

गंधवतीचा गंध संपतो;
मग अखेर संपतात
गर्भसंभवाचे सोहाळे !

अन् मग सुरू होतात,
गर्भवतीचे डोहाळे !

पण ते सोहाळे
ते डोहाळे,
–असतात एकटीचे
अगदी एकटीचेच !

–आता तिच्याकडे
–ढुंकून सुद्धा,
–भूंकून सुद्धा,
हुंगून सुध्दा,
कुणी-कुणी सुध्दा बघत नाही, !

-तरीही

गर्भवतीचे गर्भसुख

दिवसें दिवस वाढतच जाते !

—आत्मसुखाय

—स्वान्तः सुखाय

तिची एकांत तपस्या चालूच असते !

अन् ते आत्मसुख

ते स्वान्तःसुख

ते गर्भसुख

वाढतच जाते

कले-कलेने.

नव्याच काळा सुरू होईपर्यंत !

० ० ०

अन् मग नव्या कळा—

आसन्न-प्रसवेच्या

कले-कलेने वाढणाऱ्या !

आसन्न-प्रसवेच्या

त्या कळांचे

सुख-दुःख,

-तिचे तिलाच ठावे !

पण त्या कळा,

प्रसव-वेदनेच्या कळा

कला-कलांनी वाढणाऱ्या कळा,

मग केव्हातरी—

एकाएकी—

अवचित थांबतात !

० ० ०

अन् मग
सारं कसं पुन्हा शांत–शांत,
तृप्त–शांत !
रिक्त–शांत होतं !

० ० ०

–पण मग सुरू होतात
मातृत्वाचे सोहाळे !
अन् उरी-पोटीच्या कळा
—नव्या कळा !
भरल्या तट्ट स्तनांची तटतट !
स्तनांशी झटणाऱ्या
इवल्या–इवल्या–इवल्या–
–इवल्या ओठांची चुटपुट,
–किनऱ्या दातांची चुरचुर,
अन् फुटल्या पान्ह्यांचे उमाळे !
उमाळ्यावरले उमाळे !
–जणु मातृत्वाची आसवे,–
सुखाश्रूंच्या धारा !
चुरचुरणाऱ्या ओठांसाठी,
शिवशिवणाऱ्या दातांसाठी,
अंगावर लोळणाऱ्या
उबदार दुलदुलीत गोळ्यांसाठी !
सहाही स्तनांशी लुचणाऱ्या, तोडणाऱ्या
लुसलुशीत ओठांसाठी
फुटणारे पान्हे !

० ० ०

पण हे सोहाळेही
संपणारच असतात !
केव्हा तरी संपणारच असतात!

अन् ते संपतातही;

पान्हा आटल्यावर
स्तनं सुकल्यावर
मातृत्व ओसरल्यावर !

अन् मग पुन्हा सुरू होणार–
नवे ऋतुचक्र
–अंगवतीचे
–गंधवतीचे
–गर्भवतीचे
–अपत्यवतीचे–ऋतुचक्र
–कधीही न संपणारे ऋतुचक्र

० ० ०

पुन्हा सुरु होणार
गंधवतीची गुरफट !
–फरफट
–तटतट

गंधवतीचा गंध संपेपावेतो !
–अंगवतीचे अंग तुडुंब भरे पावेतो !
तिच्यापुरतं ते संपतं,

० ० ०

पण भुंकणारांचं भुंकणं,
–हुंगणारांचं हुंगणं
–ते मात्र अखंड चालूच असतं !
नित्य नव्या गंधाच्या शोधात,
त्यांची वणवण चालूच असते !

× × ×

## अच्युत

अच्युताची म्यां
पाहिलीसे च्युती !
–अन् तियेची महती,
पटली मला !

अच्युताची च्युती
तयासी शोभते,
हसू आणि होते
इतरे जनी !

येरे गबाळ्याचे
नोहे ते काम !
–काम ते अकाम
अच्युताचेची !

× × ×

## माझा मऱ्हाठाचि बोल

माझा मऱ्हाठाचि बोल
अमृतातेंहि पैजा जिंकील
ऐसी अक्षरे मेळवीन !
—तिन्ही लोकी,
—तिन्ही देशी,
—अन् तिन्ही भाषी !
अमृताते जिंकू !
पैजा मारियेल्या
अन् अखेरीला केला—
कानडी भ्रतार!
अमृतातें जिंकू !
पैजा मारियेल्या
अन् अखेरीलाकेला,
फारसी भ्रतार !
अमृताते जिंकू !
पैजा मारियेल्या
अन् अखेरीला केला,
इंग्रजी भ्रतार !
मराठी—कानडी
मराठी—फारसी
मराठी—इंग्रजी
कोण बाईल ? कोण भ्रतार ?
अमृताते कोण—पैजा जिंकणार

० ० ०

माझी मऱ्हाठाची बोल
अमृतातेंही पैजा जिंकील—
ऐसी अक्षरे मेळवीन !
तिन्ही लोकी !

० ० ०

## इये मराठीचिये नगरी

इये मराठीचिये नगरी–
ब्रम्हविद्येचा सुकाळु
अन् दुर्गादेवीचा दुष्काळु–!
–इये मराठीचिये नगरी !

• • •

इये मराठीचिये नगरी,
‘ उदंड जाहले पाणी ’
स्नानसंध्या करावया !
अन् पाषाण कोरडे रहावया !

• • •

फुका म्हणे देवा !
उगाच गांजलो;
उगाच पोळलो,
पश्चात्तापे !

ताप घडो देवा,
नको पश्चात्ताप !
लखलाभ पाप !
–देहवंता !

याच देही माझ्या
याच माझ्या डोळां
भोगू देरे मला
मायेचा सोहळा !
देहाचा सोहळा !

× × ×

अवघाची संसार
सुखाचा करीन !
—खाटल्यावरून
विठ्ठल कृपेने !

याच देही माझ्या,
याच माझ्या डोळां,
यायेचा सोहळा !
भोगू दे रे !

भोगतां भोगतां
देहाचे सोहाळे
—मुक्तीचे डोहाळे
—नको मला.

आत्म्याचाही नको,
नको कळवळा,
—टपला तो कावळा,
- पिंडालागी !

लखलाभ मला
देहाची आसक्ती
आत्म्या लाभो मुक्ती
—भली फुका !

× × ×

## चमत्काराविना नमस्कार–

चमत्काराविना
करूं नमस्कार
–ऐसा संतवर
भेटो मला !

० ० ०

बोले ज्ञानेश्वरी
बाळ ज्ञानेश्वर !
–तेवढा चमत्कार,
पुरे मला !

० ० ०

रेड्याच्या मुखाने
वेद वदविला !
–आणिले ज्ञानियाला
उणेपण !
चांग्या भेटायाला,
भिंत चालविली !
–पासष्टी शिणविली
–व्यर्थ व्यर्थ !
चमत्काराविना
करूं नमस्कार !
–ऐसा ज्ञानेश्वर,
लाभो मला !

० ० ०

# मला हवा येशू-

चमत्काराविना
करू नमस्कार;
-ऐसा संतवर
भेटो मला !

मला प्रिय येशू-
कुमारी मातेचा
-बेपत्ता बापाचा !
-गोठ्यांतला !

मला प्रिय येशू-
की जो लटकला !
बहुत तडफडला,
क्रूसावर

मला प्रिय येशू-
-जो क्रूसावर मेला
अन् नाहीच उठला,
-कबरीतून !

मला प्रिय येशू-
हाडांचा नी मासांचा,
-ठिबकल्या रक्ताचा,
क्रूसावरला !

मला हवा येशू
करुणा मातेचा.
–अन् पापी अबलेचा
–रक्षणकर्ता

मला हवा येशू,
आसूड जया हाती !
–पडे पापीवरती
साहुकारांच्या

मला हवा येशू
'थोमा' शिष्य ज्याचा !
–शंका विचारण्याचा
ज्याचा हक्क !

० ० ०

नको-नको मला—
त्याचे चमत्कार !
–माझा नमस्कार,
माझ्या येशूला !

केवढा चमत्कार !
–येशूचं जीवन
–येशूचं मरण
देहवंत !

चमत्काराविना,
करू नमस्कार
ऐसा संतवर
येशू माझा

माझा नमस्कार
ऐशा संतवरा !
नसे चमत्कारा,
थारा जेथे–

० ० ०

# कथा– या कवितांची--

सहासष्ट हे वय पहिला कविता-संग्रह प्रकाशित करण्याचे खचितच नव्हे. पण मी ते साहस करीत आहे. का ? यासंबंधी थोडासा खुलासा करणे जरूर आहे.

या संग्रहात समाविष्ट केलेल्या स्फुट लिखाणाला कविता म्हणता येईल की नाही, याबद्दल माझ्या मनात शंका आहे. खरे म्हणजे त्या केवळ नोंदी आहेत.

नोंदी - गेल्या पंचवीस तीस वर्षांत वेळोवेळी केलेल्या.

नोंदी - वेगवेगळ्या प्रसंगी–वेगवेगळ्या परिस्थितीत, वेगवेगळ्या मनःस्थितीत, वेगवेगळ्या विषयासंबंधी मुक्तपणे केलेल्या नोंदी.

वेगवेगळ्या प्रसंगांच्या, व्यक्तींच्या, दृश्यांच्या दर्शनांतून टिपलेल्या क्षणांच्या या नोंदी. विचारांच्या, विकारांच्या, भावनांच्या, कल्पनांच्या, स्मृतींच्या, स्वप्नांच्या या नोंदी.

या नोंदी जितक्या केल्या तितक्याच त्या करावयाच्या राहूनही गेल्या. त्या जशा कधी छंदात केल्या, तशाच मुक्त गद्यातही केल्या. कित्येकदा त्यांची सरमिसळही झाली.

त्या जशा जितक्या मराठीत केल्या, तशाच इंग्रजीतही केल्या.

अशा नोंदी करण्याचा छंद लागला, टिकला, तर कधी अजिबात सुटला.

या नोंदी का केल्या ? याचे उत्तर शोधणे सोपे नाही. वाटले म्हणून केल्या किंवा त्या आपोआपच होत गेल्या, असे म्हणता येईल.

काही नोंदींना कवितासदृश स्वरूप येण्याचे एक कारण संभवते.

आठवते तेव्हापासून मला शब्दांचे आणि त्यांच्या सामर्थ्याचे-चमत्कृतीचे आकर्षण सतत वाटत आलेले आहे. अर्थ व्यक्त करण्याची' सूचित करण्याची, संदिग्ध ठेवण्याची; किंवा लपविण्याची, किंवा अजिबात दिशाभूल करण्याची शब्दांची अमर्याद शक्ती पाहून मी नेहमीच चकीत झालो आहे. या शब्दांना किती वाकविता येते, त्यांना किती नवानवा अर्थ (किंवा निरर्थ—अनर्थ) देता येतो हे बघूनही मी स्तिमित झालो आहे. त्याचप्रमाणे शब्दांच्या विशिष्ट रचनेमुळे, नादामुळे, छंदामुळे शब्दाला एक वेगळेच परिमाण, वेगळेच सौंदर्य कसे लाभते, हे बघून मी नेहमीच मोहित झालो आहे.

परिणामी अगदी शाळकरी वयापासून शब्दाला शब्द जुळविण्याचा नाद मला लागला होता. या शब्द जुळवणीत अर्थातच अनुकरणाचा भाग बराच होता. विशीच्या आसपास या शब्द—जुळवणीला तत्कालीन कवितेचेही स्वरूप येऊ लागले आणि त्यातील चार-दोन कविता कुठे कुठे प्रसिद्धही झाल्या. (म्हणजे छापलेल्या मी तरी पाहिल्या !)

यानंतर मी धकाधकीच्या सार्वजनिक कार्यात पडलो. प्रथम स्वातंत्र्य लढ्यात, नंतर श्रमिक जनतेच्या आंदोलनात; आणि अखेर कम्युनिस्ट चळवळीत. सार्वजनिक चळवळींच्या धबडग्यांत पडल्यावर ही शब्द-जुळवणी आपोआपच थांबली; केव्हा थांबली हे मला कळलेही नाही !

त्यानंतर युद्ध-काळांत पहिला प्रदीर्घ, बेमुदत कारावास माझ्या वाट्याला आला. या कारावासांत दिवसभर बरेच सामुहिक जीवन असले, तरी संध्याकाळनंतर बंद कोठडीत एकांतवास अपरिहार्य असे. या एकांतवासांत मला पुन्हा शब्द—जुळवणीचा छंद जडला. मधे काही वर्षे जसा तो आपोआप सुटला होता, तसाच तो आता आपोआप परत आला. या शब्द—जुळवणीस आता काही विशिष्ट आकार

आणि थोडाफार आशय येऊ लागला होता. क्वचित् थोडीफार सफाई सुद्धा.

दोन वर्षांनंतर मी अचानकपणे कारावासातून सुटलो आणि त्याबरोबरच माझी शब्द–जुळवणीही थांबली. पहिल्या कारावासातील ही कविता वहीतच राहिली. आणि ती वहीही मध्ये बरीच वर्षे गहाळ झाली होती (अगदी अलिकडे, म्हणजे प्रस्तुत संग्रह मुद्रणास गेल्यानंतर, मला ती वही सापडली. आणि जवळपास पस्तीस वर्षांनंतर ती मी पुन्हा वाचली. आणि माझी थोडीफार करमणूकही झाली. त्या वहीतील एखादा नमुना या संग्रहात आला असता, तर वाचकांचीही थोडीफार करमणूक झाली असती.)

माझ्या पहिल्या कारावासानंतर मी पुन्हा माझ्या विविध सार्वजनिक कार्यात पडलो. आणि त्यात अगदी आकंठ बुडून गेलो. आणि त्यातच कवितेची आठवणही बुडाली !

अनेक वर्षे उलटली; आणि पुन्हा एक प्रदीर्घ भूमिगत विजनवास; आणि लगोलग दुसरा प्रदीर्घ बेमुदत करावास पुन्हा माझ्या वाट्याला आला. याच दुसऱ्या कारावासात प्रस्तुत संग्रहातील नोंदी सुरू झाल्या.

पूर्वीपेक्षा या नोंदी अगदी वेगळ्या होत्या ! आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी खोल खोल कुठेतरी नित्य नवे झरे फुटावेत; आणि धडकावर धडका मारून, कठीण खडक फोडून पाणी उसळून वर यावे, असे काहीसे झाले. आणि मग ते उसळ्यावर उसळ्या मारून उमाळे येतच राहिले ! आणि माझ्या नोंदी होतच राहिल्या.

या नोंदी पूर्वीपेक्षा काही वेगळ्या आहेत; असे वाटून, मी माझे बंधु श्री. माधव मनोहर यांना भेटीच्या वेळी त्या देऊ लागलो. त्या वाचून त्यांनाही त्यांत काही गुण आढळले असावेत आणि म्हणून त्यांनी त्या श्री. वा. ल. कुळकर्णी आणि इतर काही रसिक मित्रांना दाखविल्याचे मला कारावासांत कळले. बऱ्याच नोंदी जमल्यावर, कविता म्हणून त्यापैकी काही 'सत्यकथे' मध्ये प्रसिद्ध करण्याची

कल्पनाही निघाली. (याच काळात माझ्या काही कथा व ललित लेख वेगवेगळ्या कल्पित नावांनी काही मासिकांत व दिवाळी अंकात प्रसिद्धही झाले होते.)

माझा विनामुदत कारावास चालूच होता; आणि या नोंदीं-प्रमाणेच इतरही अनेकविध लिखाणही चालूच होते.

दोन वर्षानंतर माझा एक 'हेबिअस कॉर्पस्' अर्ज हायकोर्टाने मंजूर केला आणि अगदा अनपेक्षितपणे मी कारावासातून सुटलो.

पण यावेळी कारावास सपला; तरी नोंदी करण्याचा छंद मात्र सुटला नाही. सार्वजनिक कामाच्या घबडग्यात मी पुन्हा गुंतलो, तरीही नोंदी थांबल्या नाहीत. अशा रीतीने या नोंदी तेव्हापासून सतत होतच राहिल्या, जमतच राहिल्या.

आणखी काही वर्षे गेली; आणि आणखी एक कारावास माझ्या वाट्याला आला या कारावासात, आतापर्यंत जमलेल्या सर्व नोंदींचे थोडेसे संस्करण–परिष्करण करण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण अशा संस्करणात फारसा काही अर्थ नाही, असा अनुभव आला.

आणि जुन्या नोंदी प्रायः जशाच्या तशा कायमच राहिल्या आणि त्यांत नव्या नोंदींची भर पडतच राहिली– ती अगदी तहत–आजतागायत.

अशा रीतीने गेल्या पंचवीस तीस वर्षात शेकडो नोंदी होत गेल्या तो एक कायमचा छंदच लागला. हा छंद तसा अगदी निरुपद्रवी होता तो कसल्या इतर कामाच्या किंवा दिनक्रमाच्या अजिबात आड येत नसे. त्यांत वेळही बिलकूल जात नसे. कोणतीही वेळ, कोणतेही स्थळ, कोणतीही परिस्थिती या नोंदी करण्याच्या आड येत नसे. समोर असेल तो कागद किंवा चोपडी किंवा चिठोरे सुद्धा त्या नोंदीसाठी पुरेसे होई. अगदी चार लोकात, कामात, चर्चेतसुद्धा अशा नोंदी पटकन् होऊन जात. गुपचुप–कोणाला न कळत!

आणि खरे म्हणजे एक प्रकारे मलासुद्धा नकळतच ! या नोंदी पुन्हा माझ्या वाचनात केव्हा येतील, याचाही नेम नसे. अनेक नोंदी तर वर्षानुवर्षे तशाच पडून राहिल्या.

कालक्रमानें वयाला साठ वर्षे झाली; आणि माझे डोळेही अतिशय बिघडले, आणि कदाचित् संपूर्ण अंधत्व येण्याचाही धोका निर्माण झाला. तेव्हा दैनंदिन कामातून निवृत्त होऊन, मी माझ्या गावी म्हणजे नाशिकला येऊन स्थायिक झालो माझे सर्व कागदपत्र, चोपड्या, नोटस्, हस्तलिखिते लवकरच मी एकत्र केली, आणि त्यात काय काय आहे याचा इतक्या वर्षांनी प्रथमच अंदाज घेऊ लागलो.

हे एक प्रकारे संशोधनकार्यच होते. कारण अनेक विषयांवरील नोट्स्, संकलित लेखनाची कच्ची टिपणे, आराखडे आणि त्यामध्येच मधून मधून विखुरलेल्या या नोंदी. शिवाय काही पाकिटांत कोंबून ठेवलेली, काहीतरी खरडलेली असंख्य चिठोरी.

त्या सर्व नोंदी आता मी अगदी त्रयस्थपणे, एकत्रितपणे वाचीत होतो. पाच-दहा- वीस-पंचवीस-तीस वर्षांनी ! इतक्या वर्षां-नंतर या नोंदी वाचल्यावर काही ओळखीच्या वाटल्या; पण काही अगदी अनोळखीसुद्धा ! पुन:प्रत्ययाचा आनंद असतो म्हणतात; पण तो नेहमीच असतो असे नाही. आनंदाबरोबरच एक अबोध अस्वस्थ-ताही निर्माण झाली. आणि त्याबरोबरच एक नसती- म्हणजे आतापर्यंत नसलेली नवीनच चिंता ! या नोंदींचे करायचे काय ? आपल्या डोळ्यादेखत, म्हणजे डोळ्यांनी थोडेफार दिसते आहे तोपर्यंत, यांचे काय ते करायला हवे, हा विचार मनात घर करू लागला.

मग त्या सर्व नोंदी प्रथम एकत्र कराव्यात, जमल्यास त्यांचे काही संस्करण-परिष्करण करावे; बरेवाईट काही ठरवता आले तर ठरवावे या दिशेने विचार सुरू झाला.

इतक्या वर्षानंतर या सर्व नोंदी एकत्र केल्यावर, माझे मलाच वाटले की त्या कोणाला तरी एकत्रितपणे बघण्यासाठी द्याव्यात. म्हणून

प्रथम मीच माझ्या मताने प्राथमिक निवड केली. अनेक वर्षानंतर प्रथमच एकत्र वाचायला मिळाल्यामुळे थोडयाफार त्रयस्थ दृष्टीने मी निवड करू शकलो.

प्राथमिक निवड झाली; पण नंतर दाखविणार कोणाला? आणि येथे एक भाग्य माझ्या वाटयाला आले; ते कवि कुसुमाग्रजांच्या रूपाने. नाशिकमधील दोन तीन वर्षांच्या वास्तव्यात कुसुमाग्रजांशी माझा परिचय झाला होता. आणि तो वाढतही गेला होता. हा परिचय अगदी मनमोकळा आणि निरपेक्ष होता. गप्पांमध्ये कोणताही विषय वर्ज्य नव्हता. साहित्याविषयीही मधून मधून चर्चा होई.

आणि मग माझ्या मनात विचार आला की या नोंदी कोणाला दाखवायच्याच झाल्या, तर त्या कुसुमाग्रजांनाच का दाखवू नयेत? मराठीच्या या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कवीचेच मत घेतले, तर तेच निर्णायक ठरू शकेल. आणि या नोंदींचे काय करायचे, हा प्रश्न एकदाचा कायमचाच निकालात निघेल!

आणि असा विचार करून मी एक दिवस माझ्या नोंदी त्यांच्या स्वाधीन केल्या. (माझा जन्मजात संकोच किंवा एक प्रकारचा अहंकार लक्षात घेता मी हे साहस कसे काय केले, याचे मला आजही नवल वाटते.) पण अखेर मी हे साहस केले. ते करणे केव्हा तरी मला भागच होते; आणि साहस केले ते बरेच झाले!

निवडलेल्या नोंदींच्या तीन चोपडया कुसुमाग्रजांच्या हवाली केल्यानंतर, का कुणास ठाऊक, मला एकदम हलके वाटू लागले. इतकी वर्षे जणू मी एक भार वहात होतो; आणि तो आता उतरला होता. आतापर्यंत राहून गेलेले, कसलेसे देणे जणू मी देऊन टाकले होते;—माझे मलाच!

कुसुमाग्रजांनी आपला अनुकूल अभिप्राय व्यक्त केल्यानंतर, प्रसिद्धीचा प्रश्न आला. त्यासाठी निवड कशी करायची? एव्हाना माझी भीड थोडीशी चेपली होती; आणि निवडीचा भारही मी

कुसुमाग्रजांवरच टाकला; – अगदी निःशंकपणे ! खरे म्हणजे मी त्यांच्या सौजन्याचा आणि सहनशीलतेचा फायदा घेत होतो आणि तेही घेऊ देत होते. त्यांनी माझ्या चोपड्या पुन्हा वाचल्या आणि आपल्या पसंतीच्या खुणा केल्या. त्यावर मी त्यांना पुन्हा एकदा चाळणी लावायला सांगितली ! आणि त्यांनी पुन्हा एकदा खुणा केल्या.

संग्रह प्रसिद्ध करण्याचे पक्के ठरल्यानंतर मी अर्थातच कुसुमाग्रजांनाच प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली, तेव्हा मात्र त्यानी ज्येष्ठ समीक्षक श्री. वा. ल. कुळकर्णी यांच्याकडे बोट दाखविले.

श्री. वा. ल. कुळकर्णी यांनी पंचवीस वर्षांपूर्वी कारावासातून पाठविलेल्या माझ्या काही कविता श्री. माधव मनोहर यांच्या सांगण्यावरून वाचल्या होत्या. पण माझी त्यांची अजिबात ओळख नव्हती. तरीही त्यांनी प्रकृती बरी नसतानाही कविता वाचल्या, आणि अखेरची निवड करण्याच्या कामीही मदत केली. एका कवितेला 'त्वयासृष्टम्' हा मथळाही त्यांनीच सुचविला. आणि अखेर छोटीशी प्रस्तावनाही लिहून दिली.

निवडीच्या कामी माझे एक समीक्षक मित्र श्री. धों. वि. देशपांडे यानीही थोडी मदत केली. माधव मनोहर घरचेच; त्यानीही उत्तेजनपूर्वक हात फिरविला. अशा रीतीने श्री. कुसुमाग्रज, श्री. वा. ल. कुळकर्णी, श्री. धों. वि. देशपांडे आणि श्री. माधव मनोहर यांनी सुचविलेल्या कवितांची मी बेरीज केली. त्यांत माझ्या काही खाजगी किंवा घरगुती वशिल्याच्या कविताही जोडून दिल्या ! आणि अशा रीतीने हा संग्रह प्रसिद्ध झाला.

या उपरोक्त ज्येष्ठांचे उत्तेजन आणि सहकार्य जर लाभले नसते, तर माझ्या या नोंदी माझ्या वहीतच पडून राहिल्या असत्या.

म्हणून या सर्व ज्येष्ठांच्या सहकार्याचा निर्देश मी येथे कृतज्ञतेने करीत आहे.

१–१–८०
'कविता', कॉलेज रोड,
नासिक ५

— प्रभाकर वैद्य

# शुद्धिपत्र

| अशुद्ध | शुद्ध | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| प्रियवदा | प्रियंवदा | १ |
| आस्तिक | अस्तिक | १ |
| गवं | गर्व | १ |
| मर्तीभंजक | मूर्तीभंजक | १ |
| रणांतही | मरणातही | २ |
| कोस | नकोस | २ |
| स्वर्गसाक्षी | सर्वसाक्षी | [illegible] |
| किर्याद | फिर्याद | [illegible] |
| ऋ | ऋता | [illegible] |
| तारा | तारे | १ |
| पाणीवरती | पाठीवरती | १ |

[टीप : शीर्षक असलेल्या कवितांमध्ये कांही ठिकाणी अशी ० ० तीन टिंबे मधून मधून आलेली आहेत. त्यामुळे ती कविता संपल सारखे वाटते. पण तसे नाही.]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६०
ग्रं. क्र. २३५९८
काव्य पातळे
शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0023598
REFBK-0023598